महाराष्ट्र विधानसभा

पहिले अधिवेशन, २०१८

तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

बुधवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०१८ / फाल्गुन ९, १९३९ (शके)

(१) शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण, उच्च व तंत्रशिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य, अल्पसंख्यांक विकास आणि वक्फ मंत्री	**यांचे प्रभारी विभाग**
(२) अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, अन्न व औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री	
(३) पर्यावरण मंत्री	
(४) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री	

प्रश्नांची एकूण संख्या - ५४

साजगाव-आडोशी (ता.खालापूर, जि.रायगड) येथील प्रासोल केमिकल कारखान्यातील केमिकल मिश्रीत टाकाऊ पदार्थांमुळे पाणी दूषित होत असल्याबाबत

(१) * १०४७५८ श्री.मनोहर भोईर (उरण) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साजगाव-आडोशी (ता.खालापूर, जि.रायगड) येथील प्रासोल केमिकल या कारखान्यातील केमिकल मिश्रीत टाकाऊ पदार्थ नाल्यात सोडल्याने पाणी दूषित होऊन नागरिकांसह मुक्या जनावरांनाही धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कंपनीवर कारवाई करावी तसेच नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी मागणी लेखी निवेदनासह तेथील शेतकऱ्यांनी दिनांक ६ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास तहसिलदार यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त कारखान्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम : (१) हे अंशत: खरे आहे.
(२) होय हे खरे आहे.
(३) सदर तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत सदर कारखान्यास दिनांक ०८ जानेवारी, २०१८ रोजी प्रस्तावित निर्देश बजावण्यात आले होते. तद्नंतर उदयोगास प्रत्यक्ष सुनावणी देण्यात येऊन दिनांक २९ जानेवारी, २०१८ रोजी अंतरिम निर्देश देण्यात आले असून त्या निर्देशांमधील अटी व शर्तीच्या अनुपालनाची हमी म्हणून उदयोगाकडून रु. २ लक्ष बँक हमी घेण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

महागांव (जि.यवतमाळ) तालुक्यातील पाण्याच्या स्त्रोतांत अतिघातक जिवाणूंचे प्रमाण जास्त असल्याबाबत

(२) * ११०५४७ श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महागांव (जि.यवतमाळ) तालुक्यातील पाण्याच्या स्त्रोतांत मानव जिविताला अतिघातक असलेले कोलीफॉर्म्स, थरमोटॉलरंट जिवाणूंचे प्रमाण १६ टक्के असल्याचा अहवाल भूजल सर्वेक्षण, रसायनी अणुजैविक तज्ञांनी माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अहवालानुसार स्थानिकांना शुध्द पाण्याचा पुरवठा करण्याकरिता कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) हे खरे आहे.

अणुजैविक तपासणी अभियान २०१७-१८ अंतर्गत माहे डिसेंबर, २०१७ मध्ये महागाव तालुक्यातील एकूण ५६८ स्त्रोतांपैकी १५३ स्त्रोतांची अणुजैविक तपासणी करण्यात आली, त्यापैकी ३२ स्त्रोत दूषित आढळले.दूषित आढळलेल्या ३२ स्त्रोतांपैकी १० स्त्रोतांच्या पाणी नमुन्यामध्ये १६ टक्के,१४ स्त्रोतांच्या पाणी नमुन्यामध्ये ९ टक्के,६ स्त्रोतांच्या पाणी नमुन्यामध्ये ६ टक्के व २ स्त्रोतांच्या पाणी नमुन्यांमध्ये ३ टक्के कोलीफॉम्सचे प्रमाण आढळून आले आहे.

(२) महागांव तालुक्यातील जैविक रित्या अयोग्य आढळलेल्या पाणई स्त्रोतावर निर्जंतुकीकरण करण्याच्या सुचना संबंधीत ग्रामपंचायतीनां देण्यात आल्या आहेत. तसेच ग्रामपंचायत स्तरावर निर्जंतुकीकरणासाठी ३४ टक्के क्लोरिनची टक्केवारी असलेले ब्लीचिंग पावडर पाणी शुध्दीकरणासाठी वापरण्यात आले आहे.

वर्षातुन दोन वेळा स्त्रोत स्वच्छता सर्वेक्षण राबवुन स्त्रोत अबाधीत राहण्याची खबरदारी घेण्यात येते. यवतमाळ जिल्हयात उद्‍भवाजवळ सांडपाणी साचू नये याबाबत सोफ फिट बांधुन दक्षता घेण्यात येत आहे. तसेच तालुकास्तरीय पाणी गुणवत्ता कार्यशाळा दिनांक १६/०९/२०१७ रोजी घेण्यात आली, जलदिन व इतर कार्यक्रमाच्या माध्यमातून लोकांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

रायगड किल्ल्यावरील (जि.रायगड) सुविधांचा अभाव असल्याने पर्यटकांची होत असलेली गैरसोय

(३) * १०८५९५ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) : सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील छत्रपती शिवरायांच्या स्वराज्याची राजधानी असलेल्या किल्ले रायगडावर विद्यार्थ्यांच्या सहली तसेच देशभरातून पर्यटक मोठया संख्येने येत असतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किल्ले रायगडावर व चित्तदरवाजा परिसरात पाण्याची भीषण टंचाई, वाहनतळे नसल्याने सतत होणारी वाहतूक कोंडी यासह स्वच्छतागृह व अन्य सोयी-सुविधा नसल्याने पर्यटकांची गैरसोय होते, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच रायगड किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या पाचाड गावात सार्वजनिक बांधकाम विभागाने बांधलेल्या धर्मशाळेची देखील दुरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पर्यटकांना मुलभूत सुविधा उपलब्ध करण्यासाठी तसेच धर्मशाळेचे बांधकाम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) होय.
(२) नाही.

रायगड किल्ला हा राष्ट्रीय संरक्षित स्मारक असून तो केंद्र शासनाच्या अखत्यारित आहे. भारतीय पुरातत्व सर्वेक्षणाने पर्यटकांकरिता मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्याचे कळविले आहे.
(३) व (४) अंशत: खरे असून, मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याचे काम रायगड विकास प्राधिकरण व भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभाग यांच्या समन्वयाने करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

मु.पो.ता.अंबरनाथ (जि.ठाणे) येथील एमआयडीसी परिसरात शिधापत्रिकेवर वाटप करण्यात येणारा गव्हाने भरलेला टेंपो पकडल्याबाबत

(४) * १०४९८८ श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मु.पो.ता. अंबरनाथ (जि.ठाणे) येथील एमआयडीसी परिसरातील पटेल कंपनीच्या गोडाऊन जवळ गव्हाने भरलेला टेंपो अंबरनाथ पोलीसांनी पकडला व त्यातील ११ लाख रुपयांचा शिधापत्रिकेवर वाटप करण्यात येणारा गहू शिधावाटप दुकानाचा मालक शंकर मदार यांने कल्याण व अंबरनाथ येथील पटेल या कंपनीला काळया बाजाराने विकतांना आढळून आल्याने सदर गहू जप्त करुन तीन व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल केल्याची बाब दिनांक १४ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पटेल रिटेल या दुकानाच्या मालका विरोधात गुन्हा दाखल न करता मॅनेजर विरुध्द गुन्हा दाखल करुन संबंधित पोलीस अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक दुकान मालकाला निर्दोष सोडविण्याकरीता सहाय्य केल्याची बाब निदर्शनास येऊनही, याबाबत संबंधीत पोलीस अधिकाऱ्यांविरोधात काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, शिधावाटप दुकानाचा मालक शंकर मदार यांचेविरोधात स्थानिक नागरिकांनी जिल्हा पुरवठा अधिकारी तसेच स्थानिक अधिकारी यांचेकडे वेळोवेळी लेखी तक्रारी करुनही अधिकाऱ्यांनी कोणतीही कारवाई केली नसल्याचे निदर्शनास आले आहे त्यामुळे संबंधीत जबाबदार अधिकाऱ्यांविरोधात कोणतीही कारवाई न करण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) पटेल रिटेल प्रा. लि. या कंपनीच्या आवारातील टेम्पोमधून प्रत्येकी ५० कि.ग्रॅ.च्या ६५ गोण्यांमध्ये ३२५० कि.ग्रॅ. वजनाचा गहू, भारतीय खाद्य निगम असे लिहिलेल्या ४ गोण्या व टेम्पोच्या खाली सुटया गव्हाने भरलेल्या गोण्या असा एकूण ३६५० कि.ग्रॅ. वजनाचा गहू आढळून आला असून, बाजारभावाने त्याची अंदाजित किंमत रु. ५४,७५०/- इतकी आहे. या प्रकरणी शिवाजी नगर पोलीस ठाणे, अंबरनाथ येथे गुन्हा क्र. II/३९/२०१७, दि. १३.१२.२०१७ रोजी दाखल करण्यात आला आहे.
(२) पटेल रिटेल प्रा. लि. या कंपनीतर्फे गहू खरेदी विक्रीची संपूर्ण जबाबदारी श्री. नंदु वानजी माहेश्वरी यांच्यावर सोपविलेली असून त्यांच्या नियुक्तीपत्रात गैरकायदेशीर कृत्यास परवानगी नसल्याचे नमूद केले आहे. तसेच गहू टेम्पोतून

उतरविताना श्री माहेश्वरी यांना पकडण्यात आले आहे. यास्तव त्यांच्या विरुध्द गुन्हा नोंदविला असून कंपनीचे मालक श्री. भरत पटेल यांच्याविरुध्द अद्याप कोणताही पुरावा मिळाला नसल्याने कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(३) श्री शंकर मदार हे अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ४६-फ-६० मध्ये नोकर असून उपरोक्त दुकानाबाबत परिमंडळ कार्यालय अथवा शिधावाटप कार्यालयाकडे कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(४) या प्रकरणी नोंदविण्यात आलेल्या गुन्हयाच्या अनुषंगाने अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ४६-फ-६० ची तपासणी करण्यात आली असून, दि. १८ जानेवारी, २०१८ रोजीच्या आदेशान्वये शिधा वाटप दुकानाचे प्राधिकारपत्र निलंबित केले आहे.

मुंबई विद्यापीठाचे विभाजन करुन स्वतंत्र विद्यापीठाची स्थापना करण्याबाबत

(५) * १०४७९२ श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाची सन १८५७ मध्ये स्थापना झाली असून मुंबई उपनगर, नवी मुंबई, ठाणे पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्हयातील सुमारे ६५० महाविद्यालये संलग्न असून त्यापैकी मुंबई उपनगर, नवी मुंबई, ठाणे व पालघर या जिल्हयामध्ये सुमारे ५०० पेक्षा जास्त व सिंधुदुर्ग, रायगड, रत्नागिरी जिल्हयामध्ये सुमारे १५० पेक्षा जास्त महाविद्यालये मुंबई विद्यापीठाशी संलग्न आहेत, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रसिध्द शिक्षण तज्ञ डॉ.राम ताकवले यांच्या अध्यक्षतेखालील समितीने १०० महाविद्यालयाकरिता एक विद्यापीठ असावे व लहान विद्यापीठांची स्थापना झाल्यास अधिक कार्यक्षमतेने शैक्षणिक विकास होवू शकेल अशी शिफारस केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, सोलापूर या एकमेव जिल्हयातील केवळ ४० महाविद्यालयाकरिता स्वतंत्र सोलापूर विद्यापीठ स्थापन करण्यात आले असून मुंबई विद्यापीठाचे कार्यक्षेत्र फार मोठे असल्याने त्याअतंर्गत ६५० पेक्षा जास्त महाविद्यालये असल्याने विद्यापीठाच्या परिक्षांचा निकाल वेळेवर लागत नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याकरिता मुंबई विद्यापीठाचे विभाजन करुन मुंबई शहर व मुंबई उपनगर, नवी मुंबई यांच्यासाठी तसेच कोकणसाठी स्वतंत्र शैक्षणिक विदयापीठ स्थापन करण्याची मागणी लोकप्रतिनिधी, विविध शिक्षणप्रेमी, यांनी शासनाकडे केली असून त्यास रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील ८३ महाविदयालयांनी पाठिंबा दर्शिवला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार स्वतंत्र शैक्षणिक विद्यापीठ स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) हे खरे नाही

(५) राज्यात उच्च शिक्षणाचा दर्जा व गुणवत्ता सुधारणेसाठी मराठी भाषेचे एक विद्यापीठ राज्यात स्थापन करण्यासाठी भाषा सल्लागार समितीच्या दिनांक १ फेब्रुवारी, २०१३ रोजी पुणे येथे बैठकीत हे विद्यापीठ महाराष्ट्रात कुठे असावे याबाबत ठराव पारित झाला. सदर ठरावाच्या अनुषंगाने मुख्यमंत्री महोदयांच्या मान्यतेने शासन स्तरावरुन कार्यवाही करण्यासाठी एक समिती गठित करणे आवश्यक असल्याने सदर समितीमध्ये कोण-कोण असावे व समितीची कार्यकक्षा कशा आसाव्यात. सदर समितीमध्ये कोणते तज्ञ व्यक्तींचे नामनिर्देशन करण्यासाठी धारिका मान्यतेस्तव सादर करण्यात आली आहे. अंतिम निर्णय शासनस्तरावर विचाराधीन आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

कोथरूड (जि.पुणे) येथील एकलव्य शिक्षण संस्थेच्या तंत्रनिकेतनच्या कामकाजात त्रुटी आढळून आल्याबाबत

(६) * १०५०५० श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोथरूड (जि.पुणे) येथील एकलव्य शिक्षण संस्थेच्या तंत्रनिकेतनच्या कामकाजात गंभीर त्रुटी आढळून आल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे विभागीय तंत्रशिक्षण कार्यालयाने तंत्रशिक्षण संचालकांना संस्थेच्या तंत्रनिकेतनच्या कामकाजात आढळून आलेल्या त्रुटीबाबतचा अहवाल पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठाणे येथील सिटीझन फोरम इन सॅक्टिटी इन एज्युकेशनल सिस्टीम या संस्थेने ‘एकलव्य’ च्या कामकाजाबाबत पुणे विभागीय तंत्रशिक्षण कार्यालयाकडे तक्रार केल्यानंतर नेमण्यात आलेल्या समितीने संस्थेच्या कामकाजात अनियमितता असल्याचा अहवाल विभागीय कार्यालयाकडे पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त चौकशी अहवालात शिक्षक व कर्मचाऱ्यांची अपुरी संख्या, सेवापुस्तिका अद्ययावत न ठेवणे, शासकीय नियम व मानकानुसार संस्थेचे प्रशासकीय व शैक्षणिक कार्यपद्धती नसल्याचे नमूद करण्यात येऊन संस्थेवर कारवाई करण्याची शिफारस समितीने केली असतांनाही संस्थेवर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधित संस्थेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) व (५) संबंधित संस्थेविरुध्द प्राप्त तक्रारींचे अनुषंगाने तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडून सहसंचालक, विभागीय कार्यालय, पुणे यांचे स्तरावर दिनांक १२/१०/२०१७ चे कार्यालयीन आदेशांन्वये चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. समितीने त्याबाबत चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल तंत्र शिक्षण संचालनालयास दिनांक ४/१२/२०१७ चे पत्रांन्वये सादर केलेला आहे. तंत्र शिक्षण संचालनालयाने चौकशी समितीने नमूद केलेल्या बाबींचा मुद्देनिहाय खुलासा संबंधीत संस्थेकडून मागविण्यात येऊन त्याबाबत शहानिशा करुन सदर बाबींची पुर्तता संबंधीत संस्थेकडून करुन घेण्यात येऊन, त्याबाबत संबंधित प्राधिकरणास कळविण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीचा अंतिम अनुपालन अहवाल तंत्र शिक्षण संचालनालयास सादर करण्याबाबत सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना त्यांचे दिनांक १/१/२०१८ रोजीचे पत्रांन्वये कळविलेले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील १३१४ शाळा पटसंख्येअभावी बंद होणार असल्याबाबत

(७) * १०५३५७ श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी),

श्री.संग्राम थोपटे (भोर), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.सुनिल केदार (सावनेर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.संजय कदम (दापोली), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.अनिल कदम (निफाड), ॲड.संजय धोटे (राजूरा), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्री.अनिल बाबर (खानापूर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.बसवराज पाटील (औसा) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्व शिक्षा अभियान योजनेअंतर्गत शिक्षण हक्क कायद्यानुसार ६ ते १४ वयोगटातील मुलांना सक्तीचे व मोफत शिक्षण देणे अनिवार्य असल्याने राज्यात जिल्हानिहाय माहे डिसेंबर, २०१७ अखेरपर्यंत किती नविन शाळा सुरु करण्यात आल्या आहेत,

(२) तसेच कमी पटसंख्या असल्याने विद्यार्थ्यांची गुणवत्ता खालावत असल्याचे कारण देऊन व शिक्षण हक्क कायदयाचा आधार घेत राज्यातील १३१४ शाळा पहिल्या टप्प्यात बंद करण्याचा निर्णय शिक्षण विभागाने माहे डिसेंबर,२०१७ मध्ये घेतला असून अशा शाळांना अन्य शाळेत समायोजित करण्याबाबत शासनाने काढलेल्या परिपत्रकाला शिक्षकांनी विरोध केला असल्याचे तसेच रायगड जिल्हयातील विद्यार्थ्यांची कमी पटसंख्या असलेल्या ४२ शाळा तर रत्नागिरी जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या १८८ शाळा बंद करण्यात आल्या असून पटसंख्या अभावी १०३ शाळांचे समायोजन करण्यात येणार असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आरटीई अंतर्गत मुलांना पहिली ते पाचवीपर्यंतचे शिक्षण घरापासून एक किलोमीटर तर पाचवी ते आठवी पर्यंतचे शिक्षण घरापासून तीन किलोमीटरच्या आत असावे असे असतानाही कमी गुणवत्तेमुळे पटसंख्या कमी असलेल्या शाळा बंद करण्याच्या शासन निर्णयामुळे शिक्षणहक्क कायदयाचा (आरटीई) भंग होत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दोन शाळेतील अंतरामुळे व पटसंख्या कमी असल्याने ठाणे, मराठवाडा, विदर्भ व ग्रामीण भागातील, अकोले (जि.अहमदनगर) तालुक्यातील जिल्हापरिषद शाळा तसेच चंदगड, आजरा, गडहिंग्लज व पन्हाळा (जि.कोल्हापूर) या तालुक्यांतील डोंगराळ, दुर्गम, छोट्या छोट्या वाड्या वस्त्यांतील तसेच सातारा जिल्हयातील ३०१ शाळा बंद करण्यात येणार असल्याने या भागात कोणत्याही प्रकारची वाहतूकीची व्यवस्था नसल्याने लहान मुलांना शाळा सोडावी लागणार असल्याने अंतर तपासण्याच्या सूचना कोल्हापूर येथील शिक्षणाधिकारी यांनी माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच अकोले (जि.अहमदनगर) तालुक्यातील जिल्हापरिषद शाळा या आदिवासी दुर्गम डोंगराळ भागातील असल्याने शासनाने पटसंख्येचे निकष लावून बंद करण्यात येवू नयेत अशी मागणी मा.मुख्यमंत्री, मा.शालेय शिक्षण मंत्री यांचेकडे लोकप्रतिनिधींनी अकोले यांनी दिनांक १५ डिसेंबर २०१७ रोजी वा

त्या सुमारास केली असून, शिक्षकांनी शिक्षण विरोधी धोरणाच्या निषेधार्थ दिनांक ९ जानेवारी,२०१७ रोजी धुळे जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त मागणीच्या अनुषंगाने सदर प्राथमिक शाळा बंद करण्यात येवू नये या करिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) महाराष्ट्र स्वंयअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत सुमारे ३१३२ प्राथमिक शाळा सुरू झाल्या आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४), (५) व (६) खालावत चाललेल्या पटसंख्येच्या शाळेतील विद्यार्थ्यांचे समायोजन नजीकच्या शाळेत केल्यास विद्यार्थ्यांना समाजिकरण तसेच गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळण्याची संधी मिळेल, या भूमिकेतून शासनाने कमी पटसंख्येच्या शाळेतील विद्यार्थ्यांचे समायोजन नजीकच्या शाळेत करण्याचा निर्णय घेतला आहे. सदरचा निर्णय घेताना Rationalization of Small Schools in Maharashtra संदर्भात Unicef यांचा चंद्रपूर जिल्ह्यासंदर्भातील अहवाल विचारात घेण्यात आला होता. यासंदर्भात शासनास प्राप्त झालेली लोकप्रतिनिधींचे व अन्य निवेदने लक्षात घेता, या सर्व शाळांबाबत क्षेत्रिय अधिकाऱ्यांमार्फत तपासणी करण्यात आली असून १२९२ शाळांपैकी, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ चे उल्लंघन न करता ५६८ शाळांचे समायोजन करण्याच्या सूचना शासनाने शिक्षण संचालक (प्राथमिक), पुणे यांना दि. ३.२.२०१८ रोजीच्या पत्रान्वये दिल्या आहेत.

खैरगांव कासार पोड (ता.राळेगांव, जि.यवतमाळ) येथे शुध्द पाणी पुरवठा करण्याबाबत

(८) * ११०७८३ डॉ.अशोक उईके (राळेगाव) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खैरगांव कासार पोड (ता.राळेगांव, जि.यवतमाळ) येथे पाणी पुरवठा विभागाने केलेल्या जलस्त्रोताच्या तपासणीमध्ये अधिक प्रमाणात नायट्रेट व फलोराईड आढळून आल्याची बाब दिनांक ११ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाण्यामध्ये घटकाचे निर्धारीत केलेल्या मानके व प्रमाणानुसार पिण्याच्या पाण्याच्या पुरवठ्याची व्यवस्था करणे विभागाचे काम असतांना सदर गावात कोणत्याही प्रकारची योग्य त्या पाणी पुरवठ्याची व्यवस्था केली नसल्याचे नागरिकांनी दिलेल्या निवेदनावरून निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व तद्नुषगांने दोषी आढळलेल्या अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करून उक्त गावातील नागरीकांना शुध्द पाणी पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) हे अंशत: खरे आहे.

पाणी नमुने रासायनिक तपासणी अभियान (मान्सूनपुर्व) २०१७-२०१८ अंतर्गत मौजे खैरगांव कासार येथील एकूण ६ स्त्रोताचे पाणी नमुने तपासणी करीता उपविभागीय प्रयोगशाळा,राळेगाव येथे प्राप्त झाले होते.तपासणी अहवालात ६ पाणी नमुन्यापैकी ०१ स्त्रोतामध्ये फ्लोराईडचे तर ०२ स्त्रोतामध्ये एकूण हार्डनेस प्रमाण निर्धारीत मानकापेक्षा जास्त आढळले. नायट्रेटचे प्रमाण निर्धारित मानकापेक्षा कमी आढळल्यामुळे एकूण ०६ नमुण्यांपैकी एकही पाणी नमुना नायट्रेट बाधित आढळला नाही.

(२) हे खरे नाही.

सदर प्रकरणी रासायनिक दृष्ट्या स्विकार्य मर्यादेपेक्षा जास्त रासायनिक घटक आढळून आलेल्या नमुण्यांची माहिती प्राप्त झाल्यावर फ्लोराईड बाधित स्त्रोताचा वापर बंद करून पर्यायी स्त्रोताचा वापर करण्याबाबत संबंधित ग्रामपंचायतीना सुचना देण्यात आल्या आहेत. तसेच जैविक रित्या बाधित पाणी स्त्रोतावर निर्जंतुकीकरणासाठी संबंधित ग्रामपंचायतीना सुचना देण्यात आल्या असून ग्रामपंचायत स्तरावर निर्जंतुकीकरणासाठी पुरेशा प्रमाणात ब्लीचिंग पावडर साठा उपलब्ध ठेवण्यात आलेला आहे. वर्षातुन दोन वेळा स्त्रोत स्वच्छता सर्वेक्षण राबवुन स्त्रोत अबाधीत राहण्याची खबरदारी घेण्यात येते.

फ्लोराईड ने बाधीत उद्भवा ऐवजी गावात इतर पर्यायी पिण्याचे पाण्याचे स्त्रोत उपलब्ध आहेत.तसेच या गावात एक जलशुध्दीकरण संयंत्र बसविण्यात आले आहे.

तसेच पाणी गुणवत्ता कार्यशाळा, जलदिन व इतर कार्यक्रमाच्या माध्यमातुन लोकांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे.

(३) व (४) प्रश्नच उद्भवत नाही.

कुळगाव बदलापूर (जि.ठाणे) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या हद्दीमध्ये रासायनिक कंपन्यामुळे होत असलेले प्रदूषण

(९) * १०६८३३ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुळगाव बदलापूर (जि.ठाणे) नगरपलिका हद्दीतील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या हद्दीमध्ये रासायनिक कंपन्यामुळे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होऊन नागरिकांना डोळ्याचा व घशाचा त्रास होत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, शहरानजिक असलेल्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या क्षेत्रातील रासायनिक कंपन्या व प्रदूषण करणाऱ्या कंपन्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम : (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून उद्योगांना दिलेल्या संमतीपत्राच्या अटी व शर्तीच्या अनुषंगाने वेळोवेळी उद्योगांना भेटी देण्यात येतात. त्यामध्ये दोषी आढळलेल्या उद्योगावर जल (प्र व प्रनि) कायदा, १९७४ व हवा (प्र व प्रनि) कायदा, १९८१ मधील तरतुदी नुसार कारवाई करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

जामनेर (जि.जळगाव) येथील पं. दीनदयाळ उपाध्याय शिक्षण प्रसारक मंडळात झालेल्या गैरव्यवहाराबाबत

(१०) * १०९२८१ श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.जयकुमार गोरे (माण), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जामनेर (जि.जळगाव) येथील पं. दीनदयाळ उपाध्याय शिक्षण प्रसारक मंडळाने मागासवर्गीयांच्या आरक्षणाचा भंग करीत पदांची भरती करून गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच या संस्थेतील शाळेला मान्यता नसताना देखील शासकीय शिष्यवृत्तीचा अवैधरित्या फायदा घेतल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, मा.लोक आयुक्तांनी दिनांक १८ जुलै, २०१७ रोजीच्या आदेशान्वये सदर संस्थेकडून शिष्यवृत्ती परत घेण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त गैरव्यवहाराबाबत नाशिक विभागाच्या शिक्षण संचालकांना चौकशीचे आदेश देऊनही अद्यापही चौकशी करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदर संस्थेकडून शिष्यवृत्ती परत घेणे आणि इतर गैरव्यवहारांची चौकशी करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) अंशत: खरे आहे.
(२), (३), (४) व (५) सदर संस्थेच्या दोन शाळांपैकी प्राथमिक शाळा अनुदानित असून माध्यमिक शाळा स्वयंअर्थ सहाय्यित तत्वावर सुरु आहे. सदर शाळेतील इयत्ता ८ वी चा एक व इयत्ता ९ वी चे चार विद्यार्थी असे मिळून ५ विद्यार्थ्यांना समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद जळगाव यांच्याकडून अस्वच्छ व्यवसाय करणाऱ्या कामगारांच्या पाल्यांना रु.१८५०/- प्रत्येकी प्रमाणे एकूण रु.९२५०/- एवढी शिष्यवृत्ती देण्यात आलेली होती. सदर रक्कम संस्थेने चलनाद्वारे दि.२९.७.२०१७ रोजी परत केली आहे.

तिवसा (जि.अमरावती) तालुक्यातील ६५ वृध्द कलावंतांना पेन्शन मिळण्याबाबत

(११) * १०८२४६ ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राहुल बोंद्रे (चिखली) : सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तिवसा (जि.अमरावती) तालुक्यातील ६५ वृध्द कलावंतांना माहे ऑक्टोबर, २०१६ पासून पेन्शन मिळाली नसल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय असल्यास, त्यात काय आढळून आले त्यानुसार सदरहू वृध्द कलावंताना पेन्शन तातडीने मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) व (२) हे खरे नाही.

तथापि, अमरावती जिल्हयातील तिवसा तालुक्यातील एकूण ६५ कलावंतांपैकी १८ कलावंतांच्या बँकेचे तपशील न जुळल्यामुळे सदर रक्कम त्यांच्या खात्यात जमा करण्यात आली नाही. आता समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती यांचेमार्फत १८ कलावंतांचे योग्य खाते क्रमांक मिळाल्यामुळे दिनांक १२ फेब्रुवारी, २०१८ रोजी मानधनाची रक्कम उर्वरित १८ कलावंतांच्या खात्यात जमा करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई, नाशिक, औरंगाबाद व पनवेल येथील महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाच्या मालमत्ता प्रकरणी झालेला गैरव्यवहार

(१२) * १०४७७६ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, नाशिक, औरंगाबाद व पनवेल या चार ठिकाणच्या महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाच्या मालमत्ता प्रकरणी गैरव्यवहार झाल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गैरव्यवहाराची चौकशी गुन्हे अन्वेषण विभागाकडे वर्ग करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्राथमिक अहवालात महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाचे अधिकारी व मालमत्तेचे प्रत्यक्ष देखभाल करणारे (caretaker) यांच्या संगनमताने गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार गैरव्यवहार करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे :(१) व (२) अशंत: खरे आहे. माहे फेब्रुवारी, २०१६ व तद्नंतरच्या कालावधीत १) जैनबिया ट्रस्ट, मुंबई, २) मस्जिद दुदाधारी कठडा, नाशिक, ३) मकदूम बीबी वक्फ पनवेल, जि.रायगड आणि ४) दर्गाह दाऊद

औलिया मगरिबी, औरंगाबाद या ४ वक्फ मालमत्तांप्रकरणी गैरव्यवहार झाल्या विषयीच्या तक्रारी वेळोवेळी प्राप्त झालेल्या आहेत. त्यास अनुसरुन, उपरोक्त वक्फ मालमत्तांच्या प्रकरणी काही बेकायदेशीर व्यवहार (विक्री, अदलाबदल, दिर्घकालीन भाडेपट्टा, इ.) अनियमितता झाल्याचे किंवा वक्फ मालमत्ता हडप करण्यात आल्या आहेत किंवा कसे, या बाबींची चौकशी करण्यासाठी वर नमूद प्रकरणे, दि.३१.७.२०१७ च्या शासन पत्रान्वये राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे चौकशी करण्यासाठी सोपविण्यात आलेली आहेत.

(३) व (४) होय. प्रस्तुत प्रकरणी राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडून अद्‌याप प्राथमिक अहवाल प्राप्त झालेला नाही. तथापि, राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे या प्रकरणांची चौकशी सोपविण्यापुवी सदर प्रकरणाची शासन स्तरावरुन प्राथमिक चौकशी करण्यात आली आहे. या चौकशीत-

१) जैनबिया ट्रस्ट, भेंडी बाजार, मुंबई या वक्फ मालमत्तेबाबत गैरव्यवहार झाल्याचे आढळून आले आहे. सदर प्रकरण महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरणामध्ये न्यायप्रविष्ट आहे. सदर प्रकरणी तत्कालीन प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या विरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शि. व अ.) नियम, १९७९ च्या नियम ८ अंतर्गत विभागीय चौकशी सुरु करण्यात आलेली आहे.

२) मस्जिद दुदाधारी कठडा, नाशिक या संस्थेशी संबंधित मालमत्तेच्या गैरव्यवहाराचे प्रकरणी प्राथमिक चौकशीत तथ्य असल्याचे सकृतदर्शनी दिसून आल्याने तत्कालीन प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांना महसूल व वन विभागाच्या दि.०३.०३.२०१७ च्या आदेशान्वये शासन सेवेतून निलंबित केले होते. तथापि, मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.१५.०१.२०१८ च्या आदेशान्वये सदर निलंबन आदेश रद्द केले आहेत. सद्‌य:स्थितीत प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरणाकडे दावा दाखल असून तो न्यायप्रविष्ट आहे.

३) मकदूम बीबी वक्फ पनवेल, जि.रायगड या वक्फ मालमत्तेचे झालेले बेकायदेशीर हस्तांतरणाबाबत महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडून अहवाल मागविण्यात आला आहे.

४) दर्गाह दाऊद औलिया मगरिबी, औरंगाबाद या वक्फ मालमत्तेच्या झालेल्या अनियमिततेच्या अनुषंगाने तत्कालीन प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या विरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शि. व अ.) नियम, १९७९ च्या

नियम ८ अंतर्गत विभागीय चौकशीची प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे. तसेच या वक्फ संस्थेच्या मुतवल्लींना कायदेशीर प्रक्रिया राबवून मुतवल्ली पदावरुन दूर करण्याच्या व सदर मालमत्ता वक्फ मंडळाच्या ताब्यात घेण्याच्या सूचना महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळास देण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील तसेच मोहाडी (जि.भंडारा) तालुक्यातील गावांमध्ये फ्लोराईडयुक्त पाण्यामुळे लोकांना फ्लुरोसीस व अस्थीव्यंगासह इतर आजाराची लागण होत असल्याबाबत

(१३) * १०८०७१ श्री.चरण वाघमारे (तुमसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ११ फ्लोराईड ग्रस्त जिल्ह्यांमध्ये भंडारा जिल्ह्याचा समावेश असून मोहाडी तालुक्यात सर्वाधीक ३२ गावे फ्लोराईडग्रस्त आहेत. त्यामुळे फ्लोराईडग्रस्त विषारी पाणी पिणाऱ्या हजारो लोकांना फ्लुरोसीस व अस्थीव्यंगासह इतर आजाराची लागण होत असल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

भंडारा जिल्ह्यातील ३२ गावात एकुण ५९२ स्त्रोत असुन त्यापैकी ५४२ स्त्रोत पिण्यास योग्य आहेत व यातून पुरेसा पाणी पुरवठा होतो. उर्वरित ५० स्त्रोत फ्लोराईड बाधित आहे. परंतु या स्त्रोतांचे पाणी पिण्यास वापरत नाही.

मोहाडी तालुक्यामध्ये, शालेय सर्वेक्षणात एकूण ३३७ मुला मुलींची फ्लोरोसिस आजाराच्या अनुषंगाने तपासणी केली असता दंत फ्लोरोसिस बाधित ८ रूग्ण आढळले, परंतु कोणताही अस्थीव्यंग रूग्ण आढळला नाही.

तसेच गृह सर्वेक्षणात २२५ रूग्णांची तपासणी केली असता दंत फ्लोरोसिसचे २ व अस्थीव्यंग फ्लोरोसिसचे ३१ रूग्ण आढळले.

जिल्हयामध्ये, राष्ट्रीय फ्लोरोसिस प्रतिबंध नियंत्रण कार्यक्रमाअंतर्गत दातांचे व हाडाचे फ्लोरोसिस बाधित रूग्णांना Vit.C युक्त आहार घेणे, कोवळे ऊन व पोषक आहार घेण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले आहे. तसेच ज्या पिण्याचे स्त्रोतांमध्ये फ्लोराईडचे प्रमाण १.५ पीपीएम पेक्षा जास्त आहे त्याचे पाणी वापर करू नये याबाबत सुचना करण्यात आल्या आहेत.

फ्लोरोसिस बाधित गावांमध्ये पुन्हा फ्लोरोसिस आजाराच्या अनुषंगाने सर्वेक्षण करण्याचे नियोजन करण्यात येत आहे. तसेच ७ गावांतील फ्लोराईड बाधित पिण्याचे पाण्याचे स्त्रोतांवर सद्यस्थितीत जलशुध्दीकरण संयंत्र बसविण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

भंडारा जिल्हयातील वृद्ध कलाकारांना मानधन योजनेअंतर्गत मानधन न मिळाल्याबाबत

(१४) * १०८७०५ श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) : सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्हयातील वृद्ध कलाकार मानधन योजनेअंतर्गत सुमारे ३१ कलाकारांचा मानधन मिळण्याबाबतचा रितसर प्रस्ताव जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हापरिषद भंडारा यांचे मार्फत दिनांक ९ नोव्हेंबर, २०१७ रोजी तालुकानिहाय संचालक सांस्कृतिक संचालनालयाकडे सादर करण्यात आला आहे, परंतु अद्यापपर्यंत सांस्कृतिक विभागामार्फत कलाकारांच्या खात्यामध्ये मानधन जमा करण्यात आले नसल्याने दिनांक २३ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास स्थानिक लोकप्रतिनीधींनी संचालक, सांस्कृतिक संचालनालय, मुंबई यांना मानधन मिळावे या दृष्टीने लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) होय, हे खरे आहे.
(२) ३१ कलावंतांचे बँकेचे तपशील जिल्हा समाज कल्याण कार्यालय, भंडारा यांचेकडून चुकीचे प्राप्त झाल्याने त्यांच्या खात्यात मानधन जमा होत नव्हते. सदर ३१ कलावंतांपैकी २५ कलावंतांचे योग्य तपशील जिल्हा समाज कल्याण कार्यालय भंडारा यांचेमार्फत प्राप्त झाल्यामुळे सदर कलावंतांचे प्रलंबित मानधन त्यांच्या खात्यात दिनांक ८ फेब्रुवारी, २०१७ रोजी जमा करण्यात आले आहे. तसेच उर्वरित ६ कलावंत मयत असून त्यांच्या वारसदार पती/पत्नी यांना मानधन देण्यासाठी जिल्हा समाज कल्याण कार्यालय, भंडारा यांच्या स्तरावरुन कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

बार्शीटाकळी (जि.अकोला) तालुक्यातील ८० ग्रामपंचायतीतील ग्रामस्थांना अशुद्ध पाण्याचा पुरवठा होत असल्याबाबत

(१५) * १०९९५४ श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बार्शीटाकळी (जि.अकोला) तालुक्यातील ८० ग्रामपंचायतींच्या कार्यक्षेत्रात येणा-या गावांतील ग्रामस्थांना अशुद्ध पाण्याचा पुरवठा होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ८० ग्रामपंचायतींमध्ये पाणी शुद्धीकरण यंत्र न बसविल्याने आवश्यकतेनुसार ब्लिचिंग पाण्यात टाकून काही गावांत पाणीपुरवठा केला जातो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्राथमिक आरोग्य केंद्रातील स्वयंसेविका यांनी सदर पाण्याचे नमुने प्रयोगशाळेत नेले असता पाण्यात क्षाराचे अतिप्रमाण असल्याचे सिद्ध झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, बार्शीटाकळी तालुक्यातील अनेक लोक दुषित पाण्यामुळे किडनी, पोटाचे आजार यामुळे त्रस्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार पाणी शुद्धीकरण यंत्र बसविण्यासाठी ई-टेंडरिंग प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करून पाणी शुद्धीकरण यंत्र कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) हे अंशत: खरे आहे.

अकोला जिल्ह्यातील बार्शीटाकळी तालुक्यात एकूण ८३ ग्रामपंचायती असून १२३ गांवे आहेत.बार्शीटाकळी तालुक्यात माहे जानेवारी २०१८ पर्यंत जलसुरक्षकामार्फत ७१८ पाणी नमुने घेण्यात आले. सदर नमुन्यांची तपासणी भुजल सर्वेक्षण विकास यंत्रणेच्या अधिनस्त बार्शीटाकळी येथील प्रयोगशाळेमध्ये करण्यात आली असता ३२८ पाणी नमुने रासायनिक दृष्ट्या अयोग्य आढळून आले आहे.

(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

बार्शीटाकळी तालुक्यात माहे जानेवारी २०१८ मध्ये जलसुरक्षकामार्फत १११ (जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा अकोला) + ११ (भुजल सर्वेक्षण प्रयोगशाळा) असे एकूण १२२ पाणी नमुन्यांची अणुजैविक तपासणी करण्यात आली. त्यामध्ये अनुक्रमे १४ व १ असे एकुण १५ नमुने अणुजैविक दृष्ट्या दुषित असल्याचे आढळुन आले आहे.

त्याचप्रमाणे बार्शीटाकळी तालुक्यातील एकुण २९ ब्लिचींग पावडर नमुन्यांची तपासणी केली असता त्यापैकी २ नमुन्यांमध्ये २० टक्केपेक्षा कमी क्लोरीन असल्याचे निदर्शनास आले आहे.

(४) आरोग्य विभागाच्या तपासणी मध्ये किडनीचे ८७ व मुतखड्याचे ४ रूग्ण आढळुन आले आहेत.

(५) ज्या गावांचे पाणी दुषित आढळुन आले आहे,त्या गांवात पाणी शुध्दीकरण यंत्र माहे मार्च २०१८ अखेर बसविण्याकरिता जिल्हा वार्षिक योजने (सर्वसाधारण) अंतर्गत रू.८९.५१ लक्ष मंजूर करण्यात आले आहे.

तसेच शासन स्तरावरून मंजुर झालेल्या निधीमधून जलशुध्दीकरण यंत्र बसविण्याची कार्यवाही जलस्वराज्य टप्पा-२ अंतर्गत सुरू आहे.

राज्यातील अंत्योदय रेशन शिधापत्रकांधारकांना ५ किलो धान्य देण्याचा घेतलेला निर्णय

(१६) * १०५३०६ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्री.बसवराज पाटील (औसा) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एक ते दोन व्यक्ती समाविष्ट असलेल्या अंत्योदय रेशन शिधापत्रिकाधारकांना पूर्वी मिळत असलेल्या ३५ किलो धान्य ऐवजी ५ किलो धान्य देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील सुमारे १६०२ गरीब कुटुंबियांची रेशन कार्ड रद्द करण्यात आली असल्याने, लाभार्थी २२०४ कार्ड धारकांना तसेच अहमनदनगर जिल्हयातील अंत्योदय योजनेत समाविष्ट असलेल्या शिधापत्रिका धारकांना शासनाने निश्चित केलेला ३५ किलो धान्य कोटा मिळत नसल्याचे माहे नोव्हेंबर २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोल्हापूर जिल्हयात राबविण्यात येत असलेल्या अंत्योदय शिधापत्रिकाधारकांना दर महिन्याला २ रु. किलोप्रमाणे २१ किलो गहू व ३ रुपये प्रति किलो प्रमाणे १४ किलो तांदूळ असे एकूण ३५ किलो धान्य देण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील घेतलेल्या निर्णयानुसार ग्रामीण भागातील अंत्योदय रेशन शिधापत्रिका धारकांमध्ये नाराजी असून त्यामुळे अंत्योदय कार्डधारक रेशनच्या धान्यापासून वंचित राहणार असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त निर्णयामुळे ग्रामीण भागातील अनेक गरजू व्यक्तींवर उपासमारीची वेळ येणार असल्याने शासनाने ग्रामीण भागातील अंत्योदय रेशन शिधापत्रिकाधारकांना पुर्वी मिळत असलेले ३५ किलो धान्य देण्याचा तातडीने निर्णय घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) होय.
(२) मंगळवेढा, जि.सोलापूर येथे अंत्योदय अन्न योजनेमध्ये एकूण ५२९५ शिधापत्रिका असून, त्यापैकी १६०२ शिधापत्रिकांमध्ये केवळ १ व्यक्ती व २ व्यक्ती अंतर्भूत असूनही त्यांना ३५ किलो प्रतिमाह अन्नधान्याचा लाभ देण्यात येत होता. त्यामुळे त्या शिधापत्रिका रद्द करुन त्यामधील २२०४ सदस्यांना प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांच्या शिधापत्रिका देण्यात आलेल्या आहेत. सदर लाभार्थ्यांना प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांप्रमाणे प्रतिमाह प्रतिव्यक्ती ५ किलो अन्नधान्याचा लाभ देण्यात येत आहे.

अहमदनगर जिल्हयामध्ये माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान अंत्योदय अन्न योजनेतील शिधापत्रिकाधारकांना ३५ किलो अन्नधान्य मिळत नसल्याबाबतची कुठलीही तक्रार प्राप्त झालेली नाही. सदर योजनेत समावेश करण्यात आलेल्या लाभार्थ्यांना अन्नधान्याचा नियमितपणे पुरवठा करण्यात येत आहे.
(३) होय.

(४) व (५) अंत्योदय अन्न योजनेतील शिधापत्रिकाधारकांना प्रतिमाह ३५ किलो अन्नधान्याचा पुरवठा करण्यात येत असून, ज्या लाभार्थ्यांना प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांमध्ये समाविष्ट करण्यात आले आहे, त्यांची उपासमार होऊ नये यादृष्टीने त्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमातील तरतूदीनुसार प्रतिमाह प्रतिव्यक्ती ५ किलो अन्नधान्याचा पुरवठा करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

रायगड जिल्हा टँकर मुक्त करून जिल्ह्यात सुरळीत पाणी पुरवठा करण्याबाबत

(१७) * १०५१३६ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.भरतशेठ गोगावले (महाड) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्हा परिषदेने टँकरमुक्त करण्याची घोषणा केली असून माहे ऑक्टोबर, २०१७ ते माहे जून, २०१८ पर्यंतचा ८ कोटी ६३ लाख रूपयाच्या टंचाई कृती आराखडयात ५०८ गावे १३०९ वाडयांचा समावेश केला असून सदर आराखडा जिल्हाधिकारी रायगड यांच्याकडे मंजूरीसाठी पाठविला असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच सन २०१८ च्या टंचाई कृती आराखडयात १२३१ गावे व वाडयांवर टँकरने करण्यात येणाऱ्या पाणी पुरवठयासाठी रुपये ५ कोटी ३२ लाख रुपये तर ५७९ ठिकाणी विंधन विहीरी बांधण्यासाठी रुपये ३ कोटी ३० लाख रुपये खर्च अपेक्षित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच सन २०१७ च्या प्रस्तावित विंधन विहीरींच्या कामाचे देयक न मिळाल्यामुळे अनेक कामे अपूर्ण राहिली असल्याचे तसेच टँकरने पाणी पुरवठा करणा-या ठेकेदाराला मोबदला न मिळाल्यामुळे अनेक भागात पाणी पुरवठा केला जात नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) जानेवारी २०१७ ते जून २०१७ या कालावधीतील खोदण्यांत आलेल्या १०९ विंधन विहिरीची देयके अदा करणेकरिता व ३१ टँकरव्दारे पाणी पुरवठा करणेकरिता निधी अपुरा असल्यामुळे माहे, जुलै २०१७ मध्ये देयके पारित करण्यात आली नव्हती. तथापि, आता शासनाकडून निधी उपलब्ध करुन देण्यात आल्याने देयके पारित करण्यात येत आहेत. मात्र असे असले तरी, निधी अभावी विंधन विहिरींची कामे अपूर्ण राहिल्याने व टँकरने पाणीपुरवठा करणाऱ्या ठेकेदाराचे देयक अदा न केल्याने अनेक भागात पाणी पुरवठा केला जात नाही, ही बाब खरी नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे बिरसिंगपूर (ता.जि.बुलडाणा) येथे स्वच्छ भारत मिशन अंतर्गत शौचालयाचे लाभार्थी निवड प्रक्रियेत झालेला अपहार

(१८) * १०७६०८ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे बिरसिंगपूर (ता.जि.बुलडाणा) येथे स्वच्छ भारत मिशन अंतर्गत शौचालयाचे लाभार्थी निवड प्रक्रियेत पूर्वी लाभ दिलेले लाभार्थी निवडून दुबार लाभ देण्यात येवून सुमारे एक लाख पंचाहत्तर हजार रूपयाचा अपहार करण्यात आला असल्याचे चौकशीत निष्पन्न झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर प्रकरणात शासनाच्या अनुदान रकमेत अपहार करण्या-या संबंधीत दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास अपहारीत रक्कम वसुलीबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) अशंत: खरे आहे.

मौजे बिरसिंगपूर (ता.जि.बुलडाणा) येथे स्वच्छ भारत मिशन अतंर्गत शौचालय बांधकामासाठी एकूण १० लाभार्थ्यांना प्रति लाभार्थी रू.१२,०००/- प्रमाणे एकूण रू.१,२०,०००/- इतक्या रकमेचे दुबार वाटप करण्यात आले आहे.

(२) सदर प्रकरणी गट विकास अधिकारी पंचायत समिती बुलडाणा यांचेकडून चौकशी करण्यात आली.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलडाणा यांनी स्वच्छ भारत मिशन (जि.बुलडाणा) कक्षातील संबंधित अधिकारी तथा समन्वयक ग्रामसेवक, ग्राम पंचायत बिरसिंगपूर तसेच कंत्राटी कर्मचाऱ्यांना लेखी ताकीद दिली आहे.

(३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलडाणा यांनी दिनांक २०.११.२०१७ च्या पत्रान्वये दुबार प्रदान झालेली एकूण रू.१,२०,०००/-इतकी रक्कम संबंधितांकडून वसूल करण्याची कार्यवाही करण्याबाबत अन्यथा सदर रकमेचा भरणा करणेबाबत सचिव ग्रामपंचायत बिरसिंगपूर यांना आदेशित केले. त्यानुसार संबंधित व्यक्तींकडून वसुलीची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सासवड (जि.पुणे) येथील पुरंदर विद्यापीठ अवैधरित्या पदव्या देत असल्याबाबत

(१९) * १०६३९५ प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सासवड (जि.पुणे) येथील पुरंदर विद्यापीठ बेकायदा पदव्या देत असून त्यांना युजीसी आणि अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची मान्यता नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संस्थेच्या बीए ते बीई पदव्या बेकायदा मिळत असून संस्थेच्या संकेतस्थळावर राजस्थान विद्यापीठ व अन्य एका विद्यापीठाचा संदर्भ वापरला जात असल्याची उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडे मानवी हक्क संरक्षण व जागृती

संस्थेने तक्रार केली असून सदर प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन उच्च शिक्षण विभागाने सहसंचालकांच्या नेतृत्वाखाली अधिकाऱ्यांचे पथक नेमून पुरंदर विद्यापीठ या शिक्षण संस्थेत पाहणी करून अहवाल तयार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर संस्थेवर शिक्षण विभागाच्या सन २०१३ च्या बेकायदा शेक्षणिक संस्थाबाबत असणाऱ्या तरतुदींचा विचार करून फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबत डॉ.हरदास यांनी तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पुरंदर विद्यापीठ या शिक्षणसंस्थेच्या बोगस पदव्युत्तर पदव्या द्वारे शासन सेवेत नोकरी, बढती घेणाऱ्या कर्मचारी व अधिकाऱ्यांवर शासन काय कारवाई करणार आहे,

(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे ही खरे आहे.

(३) डॉ. हरदास यांची अशा प्रकारची कोणतीही तक्रार शिक्षण संचालनालय, पुणे, विभागीय सहसंचालक, पुणे व संबंधित पोलीस स्टेशन यांचेकडे प्राप्त झालेली नाही.

(४) पुरंदर विद्यापीठ या शिक्षण संस्थेच्या बोगस पदव्युत्तर पदव्यांद्वारे शासनसेवेत नोकरी, बढती घेतल्याची बाब अद्याप निदर्शनास आलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

अंबरनाथ (जि.ठाणे) औद्योगिक क्षेत्रातील रासायनिक कंपन्यातील वाढत्या प्रदुषणाकडे होत असलेले दुर्लक्ष

(२०) * १०९४२८ डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) औद्योगिक क्षेत्रातील रासायनिक कंपन्यातील वाढत्या प्रदुषणाकडे अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत असल्याबाबतची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधींनी सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांच्याकडे दिनांक १६ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम : (१) होय.
(२) अंबरनाथ येथील वालधूनी नदीच्या प्रवाहात फेस दिसून येत असल्याबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे दिनांक २९.०७.२०१७ रोजी प्रत्यक्ष पाहणी करुन नदीच्या पाण्याचे नमुने रासायनीक पृथ:करणाकरिता घेण्यात आलेले आहेत.

अंबरनाथ क्षेत्रातील येणाऱ्या आधुनिक वसाहतीत माहे, जाने २०१७ ते डिसेंबर २०१७ या कालावधीमध्ये दोषी आढळलेल्या उद्योगांवर जल (प्र.व.नि.) कायदा १९७४, वायू (प्र. व. नि.) कायदा १९८१ मधील तरतूदीनुसार ४९ उद्योगांना कारणे दाखवा नोटिस, ६ उद्योगांना प्रस्तावित निर्देश, व २६ उद्योगांना बंदचे आदेश बजावण्यात आलेले आहेत.
(३) प्रश्नच उद्भवत नाही.

रत्नागिरी जिल्हयातील औदयोगिक वसाहतीतील कंपन्यातून रासायनिकयुक्त पाणी खाडीत सोडल्यामुळे मासे मृत झाल्याबाबत

(२१) * १०५६३९ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण), श्री.संजय कदम (दापोली), श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आंजणी-भोईवाडी (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील जगबुडी खाडीकिनारी मोठया प्रमाणात मृत मासे आढळल्याची बाब दिनांक ८ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रत्नागिरी जिल्हयातील दाभोळ खाडीमध्ये लोटे औद्योगिक वसाहतीतील प्रदूषित पाणी सोडण्यात येत असल्याने खाडीतील मासे मृत पावत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रत्नागिरी जिल्हयातील लोटे औदयोगिक वसाहतीतील रासायनिक कचरा नजिकच्या असगणी (ता.खेड, जि.रत्नागिरी) गावातील शिगवणवाडी, पदुमलेवाडी व कोतवली गावातील मांडवकरवाडी या भागातील रस्त्यालगत टाकण्यात आल्याची बाब दिनांक ६ जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, लोटे औदयोगिक वसाहतीतील कारखान्यांचे रासायनिक विषारी सांडपाणी थेट खाडीपात्रात सोडण्यात येत असल्यामुळे वारंवार मासे मृत होणे, दूषित पाणी प्यायल्यामुळे जनावरे आजारी पडणे, पिण्याच्या पाण्याचे साठे दुषित होणे असे प्रकार घडत असून खाडीतील माशांच्या प्रजाती नष्ट होत असून त्यामुळे मत्स्य व्यवसाय संपुष्टात येत असल्याने खाडीकिनारील मच्छीमारांच्या उदरनिर्वाहाची गंभीर समस्या निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत स्थानिक ग्रामस्थांनी लोटे पोलीस दूरक्षेत्र, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ तसेच सुरक्षा विभाग, कोल्हापूर यांचेकडे तक्रार करूनही या विभागांकडून याप्रकरणी चौकशी करण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, याबाबत संबंधित शासकीय यंत्रणांनी सदर घटनेचे पंचनामे केले आहेत काय तसेच रासायनिक सांडपाणी खाडीत सोडणाऱ्या संबंधित कोणकोणत्या कारखान्यांवर कारवाई करण्यात आली आहे व याप्रकरणी चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम : (१) हे अंशत: खरे आहे.

तथापी, सदर ठिकाणी दिनांक ०९.०१.२०१८ रोजी पाहणी केली असता किनाऱ्यालगत ३० ते ३५ मासे मृत झालेले आढळले.
(२) हे अंशत: खरे आहे, परंतु लोटे एमआयडीसी येथील औद्योगिक वसाहतीतील सांडपाणी एकत्रीत करुन लोटे येथील सामुहीक सांडपाणी प्रक्रीया यंत्रणे मधून

प्रक्रिया करुन प्रक्रियाकृत सांडपाणी ७.५ कि.मी.लांबीच्या बंद नलिकेव्दारे करंबवणे खाडी येथे सोडले जाते.

(३) हे खरे नाही. तथापि दि.०७.०१.२०१८ रोजीच्या दै.लोकमत या वृत्तपत्रामध्ये आलेल्या बातमीच्या अनुषंगाने दि.११.०१.२०१८ रोजी असगणी मांडवकरवाडी येथे पाहणी केली असता सदर कचरा रासायनिक किंवा घातक घनकचरा नसल्याचे आढळून आले.

(४) लोटे औद्योगिक वसाहतीमधील औद्यागिक सांडपाणी प्रक्रिया करुन खाडीमध्ये सोडले जाते तसेच खाडीमधील पाणी जनावरे किंवा पिण्यास वापरले जात नाही.

(५) दि.०९.०१.२०१८ दूरध्वनीवरुन मासे मर्तुकीची तक्रार प्राप्त होताच सदर ठिकाणी दि.०९.०१.२०१८ जाऊन चौकशी केली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

कौठे मलकापूर (ता.संगमनेर, जि.अहमदनगर) येथील नवीन साखर कारखान्यातून व युटेक शुगर प्र.लि. साखर कारखान्यातून सोडलेल्या पाण्यामुळे होणारे प्रदुषण

(२२) * १०४९०४ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.संजय केळकर (ठाणे), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कौठे मलकापूर (ता.संगमनेर, जि.अहमदनगर) गावालगत सुरु झालेल्या नवीन साखर कारखान्याने व युटेक शुगर प्र.लि. साखर कारखान्याने सोडलेल्या सांडपाणी तसेच मोलासेसचे दुषित पाणी परिसरातील विहिरी व गावतळ्यातील पाण्यात उतरल्यामुळे तेथील नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाल्याबाबत नागरिकांनी जिल्हाधिकारी व प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्याकडे तक्रार केल्याचे दिनांक ३ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषगांने प्रदूषण मंडळाने या कारखान्यास नोटीस बजावली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम : (१) सदर कारखान्याविरुध्द दिनांक ०७/११/२०१७ रोजी श्री.भाऊसाहेब गंभीरे व इतर ग्रामस्थ यांची तक्रार जिल्हादंडाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांचेमार्फत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्राप्त झालेली होती.
(२) व (३) सदर तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिनांक ११/१२/२०१७ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली. पाहणीदरम्यान कारखान्याचे प्रक्रियायुक्त सांडपाण्याचे नमुने तसेच कारखान्याच्या परिसरातील तलावाच्या भेटीदरम्याने घेतलेल्या पाण्याच्या नमुन्याच्या पृथ:करण अहवालावरुन तलावाच्या पाण्याची व प्रक्रियायुक्त सांडपाण्याची गुणवत्ता विहीत मानकात दिसून आलेली आहे. तसेच प्राप्त तक्रार व पाहणीच्या अनुषंगाने दिनांक २६/१२/२०१७ रोजी कारखान्यास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने योग्य ती दक्षता घेण्याबाबत कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

जिवती (जि.चंद्रपूर) तालुक्यातील स्वच्छ भारत मिशन अंतर्गत झालेला गैरव्यवहार

(२३) * ११०७१३ ॲड.संजय धोटे (राजूरा), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिवती (जि.चंद्रपूर) तालुक्यातील स्वच्छ भारत मिशन अंतर्गत वैयक्तिक शौचालय बांधण्याची मोहीम सुरू असतांना तालुक्यामधील ६ ग्राम पंचायत संदर्भात शौचालय गैरव्यवहार झाल्याबाबतचा अहवाल नुकताच जिल्हा परिषदेने दिलेला असून या अहवालात सहा ग्रामपंचायतींमध्ये ८३ लाख ९४ हजारांचा गैरव्यवहार झाल्याचे दिनांक १९ जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिवती तालुक्यातील उपरोक्त ग्रामपंचायती मध्ये १३ सरपंच व ९ ग्रामसेवकांवर आरोप ठेवण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच पाटण (ता.जिवती, जि.चंद्रपूर) गावातील धनकदेवी ग्रामपंचायती अंतर्गत कारगाव (खु) मरकागोंदी, धनकदेवी, पाटागुडा, जांभूळधरा व कारगांवत्र (बु) येथिल ७२ लाभार्थ्यांचे शौचालयाचे बांधकाम न करता सरपंच व सचिवाने परस्पर संगनमत करून अनुदान घेतल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, चंद्रपूर जिल्हयातील गडचांदूर नगर परिषदेत अधिकारी, कर्मचारी व शौचालय लाभार्थी यांनी संगनमत करून स्वच्छ भारत अभियान (नागरी) च्या शौचालय योजनेसाठीच्या रक्कमेचा गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले व त्याअनुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) होय.

(२) संबधित सरपंच व ग्राम सेवक यांच्यावरील आरोपाची चौकशी करण्यात आली आहे.चौकशीअंती संबंधित ग्रामसेवक व सरंपच यांना कारणे दाखवा नोटीस बजावून संबंधितांचा खुलासा मागविण्याची कार्यवाही जिल्हा परिषद चंद्रपूर यांच्या स्तरावरुन सुरु आहे.

(३) याप्रकरणी जिल्हा परिषद चंद्रपूर स्तरावरुन चौकशी करण्यात आली असून चौकशी अहवालानुसार ग्रामसेवक व सरपंच यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला असून संबंधित ग्रामसेवक यांना निलंबित करण्यात आले आहे. तसेच चौकशी अहवालानुसार ७२ लाभार्थ्यांच्या शौचालयाचे बांधकाम न करता परस्पर संगनमत करुन तत्कालिन सरपंच व सचिवाने रु. ५,५०,८००/-एवढया रकमेचे अनुदान घेतले आहे. सदर रक्कम तत्कालीन सरपंच व तत्कालीन सचिव यांचेकडून समप्रमाणात वसूल करण्याचे आदेश जिल्हा परिषद स्तरावरुन देण्यात आले आहेत.

(४) हे खरे नाही.

(५) नगर परिषद गडचांदूर येथिल अधिकारी, कर्मचारी यांनी कोणत्याही शौचालय योजनेत गैरव्यवहार केलेला नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

तारापूर (जि.पालघर) औद्योगिक वसाहतीमधील निकिता केमिकल्स मधील वायुगळतीबाबत

(२४) * १०८८६७ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तारापूर (जि.पालघर) औदयोगिक वसाहतीमधील निकिता केमिकल्स (प्लॉट टी-६०) मध्ये दिनांक ३१ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास वायुगळतीची घटना घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तारापुर औद्योगिक वसाहतीत वायुप्रदुषण होत असल्याचे दिनांक ३ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार परिसरातील सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम : (१) व (२) तारापूर (जि.पालघर) औद्योगिक वसाहतीमधील प्रश्नाधीन कंपनीमधून वायु गळतीची दुर्घटना दिनांक ३०.१२.२०१७ रोजी घडली हे खरे आहे.

(३) या प्रकरणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत करण्यात आलेल्या चौकशी दरम्यान प्रश्नाधिन कंपनीस दिलेल्या संमतीपत्रातील अटी व शर्तीचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्याने संबंधित कंपनीस दि.०३.०१.२०१८ रोजी प्रस्तावित निर्देश बजावण्यात आले असून भविष्यात अशा प्रकारची घटना घडू नये यासाठी योग्य त्या उपाययोजना करण्याबाबातचे अंतरिम निर्देश महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत दिनांक १२.१.२०१८ रोजी सदर कंपनीस बजावण्यात आले आहेत. तसेच सदर कंपनीने जमा केलेली रु. १ लाखाची बँक हमी जप्त करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील आर्थिक दुर्बल व वंचित घटकातील विद्‌यार्थ्यांना खासगी विनाअनुदानित शाळेत प्रवेश मिळणेबाबत

(२५) * १०५०८१ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.सुनिल केदार (सावनेर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्रीमती संगीता ठोंबरे

(केज), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आर्थिक दुर्बल व वंचित घटकातील विद्यार्थ्यांना खासगी विनाअनुदानित शाळेत प्रवेश मिळावा यासाठी शालेय शिक्षण विभागाने सन २०१२ पासून २५ टक्के कोटा प्रवेश सुरु केला असून यास फारसा प्रतिसाद मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कोट्यातून प्रवेश घेतल्यास या विद्यार्थ्यांची फी राज्य व केंद्र शासनामार्फत दिली जात असल्याची माहिती पालकापर्यंत अद्याप पोहोचलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच आर्थिक दुर्बल व वंचित घटक शिक्षणाधिकार या कायद्यान्वये खाजगी विनाअनुदानित शाळेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची फी शाळांना शासनाकडून दिली जाते. मात्र गेल्या ५ वर्षात प्रतिपुर्तीची सुमारे ८०० कोटीहून अधिकची रक्कम शाळांना अदा केली नसल्याने या कायद्यांतर्गत प्रवेश न देण्याचा निर्णय ‘फेडरेशन ऑफ स्कूल असोशिएशन ऑफ महाराष्ट्र’ ने घेतला असल्याची बाब दिनांक २५ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या कायद्याअंतर्गत शाळांना मैदाने स्टेज वर्ग खोल्या जागा, उपहारगृहे आवश्यक असून शासनाच्या जाचक अटींमुळे राज्यभरातील ७ हजार खाजगी शाळा बंद पडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार विद्यार्थ्यांचा प्रवेश वाढविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) व (२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही. तथापि, अशा आशयाच्या बातम्या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाल्या आहेत.

(४) हे खरे नाही

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

हिंगोली जिल्हयातील शालेय पोषण आहाराचा तांदूळ काळ्या बाजारात विक्री होत असल्याबाबत

(२६) * १०६७७१ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.भारत भालके (पंढरपूर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयातील शालेय पोषण आहाराच्या तांदळाची काळया बाजारात विक्री होत असून दिनांक ३ ते ४ जानेवारी, २०१८ दरम्यान मध्यरात्री नर्सो टी-पॉईटंजवळील एका पेट्रोल पंपाजवळ शालेय पोषण आहारातील तांदूळाचे दोन टेम्पो पोलीसांच्या पथकाने पकडले असल्याचे दिनांक ४ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) व (२) सेनगाव जि. हिंगोली तालुक्यातील पात्र शाळांना शालेय पोषण आहार योजनेंतर्गत तांदूळ व इतर धान्यादी मालाचा पुरवठा करण्यासाठी निघालेल्या २ वाहनांना संशयित साहित्य असल्याच्या कारणाने

दि.०३/०१/२०१८ रोजी पोलीसांनी ताब्यात घेतले होते. तथापि, सदर साहित्य शाळांना वाटप करण्यासाठी नेत असल्याची पोलीसांची खात्री झाल्याने सदर वाहने सोडून देण्यात आली आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील अनुदान प्राप्त शाळांना अनुदान टप्पा लागू करुन निधी मंजूर करण्याबाबत

(२७) * ११०७१४ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २० टक्के अनुदान प्राप्त शाळांना प्रचलित नियमानुसार अनुदान टप्पा लागू करावा, पात्र शाळांना तात्काळ निधी मंजूर करावा अघोषित शाळा निधीसह घोषीत कराव्यात, अतिरिक्त ठरणाऱ्या विनाअनुदानीत शाळेतील शिक्षकांना सेवा संरक्षण दयावे याकरिता राज्यातील कायम विनाअनुदानीत शाळा कृती समितीतर्फे दिनांक १५ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास एक दिवस शाळाबंद आंदोलन करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आंदोलनात मराठवाड्यातील ८० टक्के शाळांनी सहभाग घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त मागण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) यासंदर्भात आवश्यक कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील ग्रामीण पाणीपुरवठा योजनेमध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत

(२८) * १०६२२४ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.रणजीत कांबळे (देवळी), श्री.राहुल बोंद्रे (चिखली) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागात भारत निर्माण व मुख्यमंत्री पेयजल योजनांमधून पाणीपुरवठा योजना राबविली जात असूनही ४३३६४ गावे टंचाईमुक्त झाली नसल्याचे दिनांक ८ जानेवारी, २०१८ वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील उक्त पाणीपुरवठ्याच्या योजना यशस्वीपणे राबविल्या नसून यात कोटयवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचा आक्षेप नोंदवून ५१ मुद्यांचा अहवाल लेखापरिक्षकांनी सन २०१२-२०१३ मध्ये शासनाकडे पाठविला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील जिल्हा परिषदांनी ग्रामीण पाणीपुरवठा योजनेसाठी खर्च केलेल्या निधीचे लेखापरिक्षण केलेले नसून स्थानिक लेखा विभागाने लेखा परिक्षण करणे अनिवार्य असतांनाही या विभागाने लेखापरिक्षण केले नसल्याने गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे.

सदर ५१ मुद्यांचा अहवाल संपूर्ण राज्याशी संबंधित नसून, जिल्हा परिषद, अमरावती यांच्याशी संबंधित आहे.

स्थानिक निधी लेखा परीक्षा, अमरावती यांचेद्वारा जिल्हा परिषद, अमरावती अंतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या सन २०१२-१३ च्या लेखा परिक्षण अहवालात आक्षेप क्र.५ मध्ये राष्ट्रीय पेयजल योजने अंतर्गत झालेल्या

खर्चासंबंधी मोजमाप पुस्तिका तथा आवश्यक अभिलेखे लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध न झाल्यामुळे मुळ प्रमाणकासह अभिलेख्याची तपासणी न होणे या आक्षेपांतर्गत ५१ मुद्दे नोंदविण्यात आले आहेत.

(३) व (४) जिल्हा परिषदांनी ग्रामीण पाणीपुरवठा योजनेंतर्गत जिल्हा निधीत जमा केलेल्या अनुदानाच्या अनुषंगाने खर्च केलेल्या निधीचे स्थानिक निधी लेखा विभागामार्फत लेखा परिक्षण करण्यात आले आहे.

प्रस्तुत प्रकरणी जिल्हा परिषद, अमरावती यांनी सदर आक्षेपांबाबत अनुपालन अहवाल सह संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा विभाग, अमरावती यांना सादर केला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

अचलपूर व चांदूरबाजार (जि.अमरावती) तालुक्यातील पाणीपुरवठा योजनेबाबत

(२९) * १०६६८० श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अचलपूर व चांदूरबाजार (जि.अमरावती) तालुक्यातील मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमाअंतर्गत मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली नागपूर येथे दिनांक १५ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास ८३ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेचे सादरीकरण करण्यात आले व मा.मुख्यमंत्री महोदयांच्या निर्देशानुसार एकूण १४२.१० कोटी रुपयांच्या या योजनेस मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग अमरावती यांनी दिनांक २७ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास सुधारित तांत्रिक मान्यता प्रदान करून सदरचा प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी शासनाकडे सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावास तातडीने मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) व (२) मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत समाविष्ट असलेल्या अचलपूर व चांदूरबाजार तालुक्यातील (जि.अमरावती) ८३ गांवे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेचे अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे अध्यक्षतेखालील तांत्रिक समितीसमोर दि.१५.१२.२०१७ रोजी सादरीकरण पार पडले. सदर सादरीकरणादरम्यान तांत्रिक समितीने योजनेच्या अंदाजपत्रकात काही बदल सुचविले होते. त्यानुसार सुधारित प्रस्ताव शासनास दि.२९.१२.२०१७ रोजी प्राप्त झाला आहे. त्यानुषंगाने योजनेच्या सुधारित प्रस्तावाचे अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे अध्यक्षतेखालील तांत्रिक समितीसमोर दिनांक ०१.३.२०१८ रोजी सादरीकरण आयोजित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

'मुंबई विद्यापीठ लॉ ॲकॅडमी (उमला)' च्या वतीने सुरु करण्यात आलेला अभ्यासक्रम बंद पडणार असल्याबाबत

(३०) * १०५१६९ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.भारत भालके (पंढरपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.संजय पोतनीस (कलिना), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या मुंबई विद्यापीठ लॉ ॲकॅडमी (उमला) च्या वतीने सन २०१५ मध्ये सुरु करण्यात आलेल्या पदवी व पदव्युत्तर असा पाच वर्षाचा

अभ्यासक्रम विद्यापीठाच्या निष्क्रीयतेमुळे बंद पडण्याची वेळ आल्याने दीडशे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, उक्त अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी बार कौन्सिल ऑफ इंडियाने नेमून दिलेल्या किमान अटींची पूर्तताही विद्यापीठाने अद्याप केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अभ्यासक्रमाचे तिसरे वर्ष सुरु असतानाही विद्यापीठाने पूर्णवेळ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली नसून संचालक पदही रिक्त असल्याचे तसेच सन २०१५ मध्ये तत्कालीन तत्वावर नियुक्त केलेल्या, दोन शिक्षकांची मुदत संपूनही त्यांना मुदत वाढ देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार शैक्षणिकदृष्टया नुकसान होवू नये याकरिता बार कौन्सिल ऑफ इंडियाने नेमून दिलेल्या अटीचे तसेच कायमस्वरुपी शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) सदर ॲकॅडमीसाठी बार कौन्सिलच्या अटी आणि आकृतीबंध विचारात घेऊन दिनांक ११ ऑक्टोबर, २०१७ रोजी झालेल्या विद्वत परिषदेमध्ये शिक्षक संवर्गातील पदे निर्माण करण्यासाठी ठराव करण्यात आला व त्यानुषंगाने दिनांक २८ नोव्हेंबर, २०१७ रोजी पार पडलेल्या व्यवस्थापन परिषदेमध्ये ११ महिन्यांकरिता हंगामी स्वरुपात शिक्षकांची पदे भरण्यात यावी असा ठराव करण्यात आला. त्यानुषंगाने शिक्षक भरतीबाबत दिनांक ०८ फेब्रुवारी, २०१८ रोजी थेट मुलाखत घेऊन तात्पुरत्या स्वरुपात ११ महिन्यांकरीता नेमणूक करण्यात आलेली आहे. नेमणूक झालेल्या शिक्षकांना नेमणूक आदेश देण्याची प्रक्रिया सुरु आहे. तसेच संचालक व शिक्षकांची पदे नियमित स्वरुपाची

असल्यामुळे विहित प्रक्रियेने सदर पदे भरण्याची प्रक्रिया विद्यापीठ स्तरावर लवकरच करण्यात येणार आहे. उक्त ॲकॅडमीमध्ये ०२ पूर्णवेळ हंगामी कनिष्ठ टंकलिपिक आणि ०२ पूर्णवेळ हंगामी शिपाई असे पूर्णवेळ हंगामी शिक्षकेत्तर कर्मचारी कार्यरत आहेत. या ॲकॅडमीसाठी वर्ग खोल्या, ग्रंथालय, वाचनालय आणि मूट कोर्ट यांसाठी विद्यापीठाने जागा निश्चित केली असून आजमितीस नियमित वर्ग आणि शिकवणी सुरु असून कोणत्याही विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही यासाठी विद्यापीठ कटीबध्द आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यात दुषित पाण्यामुळे कावीळची साथ पसरल्याबाबत

(३१) * १०७४५१ श्री.संजय कदम (दापोली) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यात पिण्याचे पाणी दूषित झाले असल्याकारणाने माहे डिसेंबर मध्ये २०० रुग्णांना कावीळ झाल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खेड शहराला नळपाणी पुरवठा करणाऱ्या जगबुडी व चोरद नदीचे पाणी दूषित झाले असून शहरात व नदीवरील तालुक्यातील गावांमध्ये या आजाराने ग्रस्त रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खेड नगरपालिकेच्या पदाधिकाऱ्यांनी यासाठी आरोग्य विभागाच्या निष्क्रियपणामुळे त्यांचेकडून आरोग्य तपासणी शिबिरे व रुग्णांना उपचार तसेच क्लोरीन चा पुरवठा होत नसल्याने याबाबत अनियमितता असल्याने उक्त सुविधा न दिल्यास आंदोलन करण्याचे नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले, त्यानुसार शुध्द पाणीपुरवठा करण्यासह काविळीची साथ नियंत्रणात आणण्याबाबत तसेच संबंधित जबाबदार कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) हे अंशत: खरे आहे.

माहे डिसेंबर २०१७ ते माहे जानेवारी २०१८ या कालावधीत एकूण १८८ रूग्णांना कावीळ झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

जगबुडी व चोरद नदीचे पाणी दूषित झाल्याचे आढळून आले आहे. तसेच वर नमूद केल्याप्रमाणे दूषित पाण्यामुळे आजारांने ग्रस्त रुग्णांची संख्या नियंत्रणात असून कोणतीही वाढ झाली नाही.

(३) हे खरे नाही.

खेड शहरामध्ये संशयित व बाधित रूग्णांना प्रतिबंधात्मक उपचार करण्यात आले आहेत.

दैनंदिन पाणी शुध्दीकरण, टँकर व्दारे शुध्द पाणी पुरवठा, दैनंदिन रोग सर्वेक्षण व परिसर स्वच्छता,जनजागृती तसेच शहरातील हॅाटेलस, गृहनिर्माण संस्थांची पाण्याची तपासणी याव्दारे सदर कावीळची साथ नियंत्रणात आणण्यात आली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

नांदेड जिल्ह्यात दूषित पाणीपुरवठा केला जात असल्याबाबत

(३२) * ११०१६० श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याच्या विविध स्त्रोतामधून तपासणीसाठी सुमारे ४ हजार ७३ पाणी नमुने पिण्या अयोग्य/दुषित असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त पिण्याच्या पाण्याचे स्त्रोतांतील पाणी पिण्यास अयोग्य असल्याचा अहवाल जिल्हा प्रयोगशाळेने दिल्यानंतरही नागरिकांकडून दूषित पाण्याचा वापर पिण्यासाठी होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली तसेच शुध्द पाणीपुरवठा करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) हे अंशतः खरे आहे.

नांदेड जिल्हयात एकूण १३०९ ग्रामपंचायती असून जिल्हा आरोग्य प्रयोगशाळेकडून प्राप्त अहवालानुसार शहरी व ग्रामीण असे एकूण १९१०३ अनुजैविक तपासणी करण्यात आली असून त्यापैकी ४०४३ पाणी नमुने अयोग्य/दुषित असल्याचे निदर्शनास आले.
(२) व (३) हे खरे नाही.

नांदेड जिल्हयातील एकूण १९१०३ पाणी नमुन्यांपैकी ग्रामीण भागातील एकूण १३३६८ पाणी नमुने अनुजैविक तपासणी करण्यात आली असून त्यापैकी ३५८१ पाणी नमुने अयोग्य/दुषित असल्याचा अहवाल जिल्हा आरोग्य प्रयोगशाळेकडून प्राथमिक आरोग्य केंद्रास तसेच संबंधित ग्रामपंचायतीस कळविण्यात आला आहे.

जलसुरक्षकांमार्फत टी.सी.एल द्वारे संबंधित स्त्रोतांच्या पाण्याचे शुध्दीकरण करुन पाणी पुरवठा करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक जिल्हयातील रेशनिंग दुकानात तूरडाळ उपलब्ध करुन देण्याबाबत

(३३) * १०६०२७ श्री.अनिल कदम (निफाड) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्हयातील रेशनिंग दुकानासाठी ४ हजार ९२७ क्विंटल तूरडाळ मंजूर करण्यात आली असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हयातील शिधापत्रिकाधारकांची संख्या पाहता केवळ ६५ टक्केच तूरडाळ मंजूर झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उर्वरित ३५ टक्के तूरडाळ उपलब्ध करुन देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) होय.
(२) व (३) सर्व शिधापत्रिकाधारकांना तूरडाळ वितरित करावयाची असल्याबाबत सहकार पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या शासन निर्णयान्वये निर्णय घेण्यात आला. सद्यस्थितीत राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमातील पात्र लाभार्थ्यांचा विचार करुन प्रत्येक जिल्ह्याला नियतन देण्यात आले आहे. परंतु, तूरडाळीच्या विक्रीचे प्रमाण विचारात घेऊन, संबंधितांना त्याअनुषंगाने सध्या प्राप्त झालेल्या तूरडाळीचे वाटप झाल्यानंतर जिल्ह्यासाठी आवश्यक असलेल्या अतिरिक्त तूरडाळीची मागणी मार्केटिंग फेडरेशनकडे करण्याबाबत सर्व जिल्ह्यांना कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील अनेक शाळांमध्ये पायाभूत सुविधांचा अभाव असल्याबाबत

(३४) * ११०७४४ श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.विजय औटी (पारनेर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.अजित पवार

(बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शाळांमध्ये पायाभूत सुविधांचा अभाव असल्याचे चाईल्ड राईट्स अँड यू अर्थात (क्राय) आणि बाल हक्क अभियान यांनी मुंबई, पुणे, अहमदनगर, गडचिरोली, औरंगाबाद, परभणी, लातूर आणि बीड या आठ जिल्ह्यांमधील १२२ शाळांच्या केलेल्या सर्वेक्षणातून दिनांक २४ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सर्वेक्षणात मुला-मुलींसाठी वेगवेगळी स्वच्छतागृह ,पिण्याचे पाणी शुध्द करण्याचे उपकरण, खेळाचे मैदान व ग्रंथालय नसणे तसेच १३ टक्के शाळांना इमारत नसल्याचे, २१ टक्के शाळांना संरक्षण भिंत नसल्याचे, तर ५७ टक्के शाळांमध्ये पूर्णवेळ प्राध्यापकांची नेमणूक करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त शाळांमध्ये पाणी शुध्दीकरणाची सोय नसल्याने विद्यार्थ्यांना अशुध्द पाणी प्यावे लागत असल्याचे तर ६९ टक्के शाळांमध्ये शौचालय असले तरी त्याची स्वच्छता करण्यासाठी कर्मचारी नसल्याने ते काम विद्यार्थी आणि शिक्षकांना करावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने राज्यातील शाळांची शिक्षण हक्क कायद्यांतर्गत पाहणी केली आहे काय, असल्यास, सदर पहाणीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने शिक्षण हक्क कायद्यातील तरतुदींचे पालन न करणाऱ्या शाळांवर कारवाई करण्यासह शाळांमध्ये पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने शिक्षण हक्क कायद्यातील १० निर्देशकांची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) व (२) अंशत: खरे आहे.

याबाबत दिनांक २४/०१/२०१८ रोजी “द आफ्टरनुन” या वृत्तपत्रात वृत्त आलेले आहे.

(३) जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये जिल्हा वार्षिक योजनेतून शुध्दीकरण यंत्रे बसविण्यात आली आहेत. अन्य शाळांमध्ये लोकसहभागातून तसेच विविध बँकांच्या सहकार्यातून पाणी शुध्दीकरण यंत्रे बसविण्यात आली आहेत, शाळांमधील स्वच्छतागृहांची स्वच्छता विद्यार्थी व शिक्षकांमार्फत केली जात नाही.
(४) पायाभूत सुविधांची पूर्तता करणाऱ्या शाळांना आर.टी.ई. ॲक्ट नुसार ३ वर्षासाठी तात्पुरती मान्यता दिली जाते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

नांदेड जिल्हयात स्वच्छ भारत मिशन् अंतर्गत शौचालय बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

(३५) * १०९१४५ श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्हयात स्वच्छ भारत मिशन अंतर्गत ग्रामीण भागात शौचालय बांधकामासाठी विशेष मोहिम राबविण्यात येत असून शौचालय बांधकामाची गती वाढून मागील वर्षभरात रुपये १ लाख ३५ हजार ७२४ शौचालयाचे बांधकाम करण्यात आले असून १ लाख २६ हजार ८५३ लाभार्थ्यांना बांधकामाची रक्कम देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याकरिता रुपये ८८ कोटी ४७ लाखाचा निधी आवश्यक असून जिल्हा परिषदेने शासनाकडे या निधीची मागणी केली असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त कामासाठी लागणाऱ्या निधीची तरतूद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) अंशत: खरे आहे

नांदेड जिल्हयात स्वच्छ भारत मिशन अंतर्गत ग्रामीण भागात १,६६,५८८ शौचालयाचे बांधकाम करण्यात आले असून, त्यापैकी ९०४३९ लाभार्थ्यांना प्रोत्साहनपर रक्कम देण्यात आलेली नाही.

(२), (३) व (४) स्वच्छ भारत मिशन (ग्रा)अंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात जानेवारी, २०१८ पर्यंत रू.७५५३२.७१ लक्ष इतका निधी केंद्र शासनाकडून प्राप्त झालेला असून, त्यापैकी ३९०५.६२ लक्ष इतका निधी नांदेड जिल्हा परिषदेला वितरीत करण्यात आलेला आहे.

आता, केंद्र शासनाने स्वच्छ भारत मिशन (ग्रा) अंतर्गत फेब्रुवारी, २०१८ मध्ये रू.४०००० लक्ष इतका निधी वितरीत केला आहे. सदर निधीमधून नांदेड जिल्हयासाठी स्वच्छ भारत मिशन(ग्रा) अंतर्गत आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

नागपूर जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने शिक्षकांची अवैधरित्या भरती केल्याबाबत

(३६) * १०६०१८ श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने सन २०१० ते २०१६ या काळात ७२२ शिक्षकांना मान्यता देऊन १००० च्यावर शिक्षकांना अवैधरित्या सेवासातत्य दिल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, सन २०१२ नंतर शिक्षकांची भरती बंद करण्याचा निर्णय होवूनही शिक्षकांची भरती केली गेली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्या अनुषंगाने दोषी आढळणाऱ्या व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) होय, अंशत: हे खरे आहे

९१ शिक्षकांच्या नियुक्तीस मान्यता देण्यात आल्या आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) तत्कालीन शिक्षणाधिकाऱ्यांची विभागीय चौकशी चालू आहे.

राज्यात शहरी तसेच ग्रामीण भागात नवीन टंकलेखन / लघुलेखन संस्थांना (शासनमान्य) परवानगी देण्याबाबत

(३७) * १०६०४५ श्री.अनिल बाबर (खानापूर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शहरी तसेच ग्रामीण भागात नवीन टंकलेखन / लघुलेखन संस्थांना (शासनमान्य) परवानगी देण्याबाबतचे कोणतेही नवीन प्रस्ताव महाराष्ट्र वाणिज्य विभाग, शिक्षण संस्था यांनी घेणे बंद केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन मान्य संगणक संस्थाही मर्यादित असल्याने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासकीय किंवा खाजगी नोकरीकरिता शासकीय टंकलेखन/ संगणक टायपिंग प्रमाणपत्र आवश्यक असल्याने सदरहू संस्थांना मान्यता देण्याबाबतची मागणी मा. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांच्याकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) संपूर्ण राज्यात एकूण ३१४४ शासनमान्य मॅन्युअल टंकलेखन व संगणक टंकलेखन संस्था असून त्यामार्फत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

घणसोली सेक्टर-११ (नवी मुंबई) येथील खाडी किनारी जाळण्यात येणाऱ्या कचऱ्यामुळे प्रदूषणात झालेली वाढ

(३८) * १०५०७४ श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घणसोली सेक्टर-११ (नवी मुंबई) येथील खाडी किनारी मुंबईतील नालेसफाईतून निघालेला कचरा खजुराची पोती व जैविक कचरा मोठया प्रमाणात जाळण्यात येत असल्याने उक्त परिसरात वायुप्रदूषण होत असल्याची बाब दिनांक १६ जानेवारी, २०१८ वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवी मुंबईतील दुषित पाण्यामुळे व वायूप्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून अनेक नागरिकांना डोळे चुरचुरणे व श्वसनाचे विकार जडले असून प्रदूषण रोखण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीं यांनी मा. पर्यावरण मंत्री व प्रदूषण नियंत्रण मंडळ यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींनी नवी मुंबई परिसरात होणारे प्रदुषण रोखण्यासाठी प्रदुषण नियोजन मंडळाच्या अधिकाऱ्यांसमवेत उक्त प्रदुषीत परिसराचा पाहणी दौरा माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान केला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,असल्यास त्यात काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम : (१) नवी मुंबई महानगरपालिकेकडून दिनांक ०८.०१.२०१८ रोजी घणसोली सेक्टर- ११, भूखंड क्रमांक ९ याठिकाणी जैविक कचरा जाळत असल्यामुळे वायूप्रदूषण होत असल्याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास तक्रार प्राप्त झालेली होती.

(२) होय.

(३) होय.

(४) सदर पाहणीदरम्यान कुठल्याही उद्योगाचे औद्योगिक सांडपाणी थेट नाल्यामध्ये जात असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई विद्यापीठातील उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन तसेच पुनर्मुल्यांकन प्रलंबित असल्याबाबत

(३९) * १०५०४९ ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठातील सहाहजार उत्तर पत्रिकांचे पुनर्मुल्यांकन हे अद्यापपर्यंत प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कला, विज्ञान व वाणिज्य शाखेच्या पुनर्मुल्यांकनासाठीचे अर्ज कमी प्रमाणात आले असूनही त्यांचे निकाल मात्र मोठ्या प्रमाणात प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, मुंबई विद्यापीठाच्या पदवीच्या पहिल्या सत्रातील परिक्षांचा निकाल वेळेत जाहिर करण्यासाठी उच्च शिक्षण विभागाने मुल्यांकन पूर्ण करण्याची दिलेली दिनांक १० जानेवारी, २०१८ पर्यंतची मुदत संपली तरीही पाच लाख उत्त्तरपत्रिकांचे मुल्यांकन प्रलंबित असून त्यापैकी सर्वाधिक वाणिज्य शाखांचे मुल्यांकन प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(४) तसेच, मुंबई विद्यापीठाच्या हिवाळी सत्राच्या निकालासाठी पेपर तपासणीच्या कामासाठी प्राध्यपकांचा आवश्यक तेवढा प्रतिसाद मिळत नसल्याचे तसेच विद्यार्थ्यांच्या परिक्षा, पेपर तपासणी संदर्भात सुरु असलेल्या अनियमितते विरोधात विद्यार्थ्यांनी दिनांक २३ व २४ जानेवारी, २०१८ रोजी व त्या सुमारास मुंबई विद्यापीठाच्या फोर्ट व कलीना कँपसमध्ये आंदोलन करुन मा.प्रभारी कुलसचिव, मुंबई विद्यापीठ यांचेकडे निवेदन सादर केले होते, हे ही खरे आहे काय,
(५) तसेच मुंबई विद्यापीठाने ४७७ निकाल दिनांक १९ सप्टेंबर, २०१७ रोजी जाहीर केले आहे परंतु प्रत्यक्षात सर्व निकाल जाहिर न केल्यामुळे दिनांक १९ सप्टेंबर नंतरही हजारो विद्यार्थी हे निकालापासून वंचित आहेत, तसेच सदर विद्यार्थ्यांनी पदव्यूत्तर अभ्यासक्रमांना प्रवेश घेतला, तथापि पदवीचा निकाल न लागल्यामुळे प्रवेश रद्द झालेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयांनी फी परत करण्यास नकार दिल्यामुळे, विद्यार्थ्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याची बाब विद्यार्थी संघटनेने माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आणून दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार विद्यार्थ्यांचे आर्थिक नुकसान होऊ नये या करीता कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) होय, हे खरे आहे.
(५) हे खरे नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

कोल्हापूर जिल्हयातील एपीएल धारक नागरीकांना शिधापत्रिकेवरील धान्याचे वाटप करण्याबाबत

(४०) * १०७१६२ श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयात बीपीएल व एपीएल अशा कार्डावरील सुमारे २४ लाख लोकांनाच अन्न सुरक्षा योजनेंतर्गत रेशनवरून धान्य दिले जात असून १४ लाखाहून अधिक नागरीकांचा एपीएल यादीत समावेश असतानाही त्यांना शिधापत्रिकेवरील धान्यापासून वंचित रहावे लागत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार कोल्हापूर जिल्हयातील एपीएल शिधापत्रिका धारकांना स्वस्त धान्य दुकानामार्फत देण्यात येणारे धान्य मिळावे याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) होय.
(२) व (३) राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमांतर्गत शहरी भागात कमाल रु.५९०००/- पर्यंत उत्पन्न असणाऱ्या लाभार्थ्यांचा व ग्रामीण भागात कमाल रु.४४,०००/- पर्यंत वार्षिक उत्पन्न असलेल्या लाभार्थ्यांचा पात्र लाभार्थी म्हणून

समावेश करण्यात आला आहे. राज्यामध्ये सध्या शिधापत्रिकांच्या आधारकार्ड सिडींगचे काम सुरु असून, त्याबाबतचे विभागाचे काम बहुतांश पूर्ण झालेले आहे. शिधापत्रिकांच्या आधार सिडींगचे काम पूर्ण झाल्यावर राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या सदर लाभार्थ्यांना अन्नधान्याचा लाभ देण्याबाबतचा निर्णय दिनांक १५ जानेवारी, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

शासन निर्णय दिनांक ३.३.२०१७ अन्वये राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत कोल्हापूर जिल्ह्यात एकूण २४,७६,८०९ एवढ्या लाभार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. सदर लाभार्थ्यांना अन्नधान्याचा लाभ सुरळीतपणे देण्यात येत आहे. शिधापत्रिकांच्या आधार सिडींगचे काम पूर्ण झाल्यावर अपात्र शिधापत्रिकाधारक असतील त्यांची लाभार्थी म्हणून नोंद होणार नसल्याने ते आपोआप रद्द होतील. तद्नंतर इष्टांकाच्या मर्यादेमुळे राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत समावेश न झालेल्या कोल्हापूर जिल्ह्यामधील एकूण १३,२९,९१४ एपीएल (केशरी) लाभार्थ्यांपैकी पात्र लाभार्थ्यांची निवड करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

मुंबई शहरातील, हवेतील प्रदूषणाची पातळी धोकादायक स्थितीत असल्याबाबत

(४१) * १०५१६३ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.भारत भालके (पंढरपूर) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात, माझगाव, मालाड, बोरीवली, कुर्ला आदी परिसरात माहे नोव्हेंबर २०१७ ते जानेवारी २०१८ या कालावधीत हवेतील प्रदुषणाची पातळी २३६ ते ४३६ इतक्या धोकादायक स्तरापर्यंत (क्वालिटी इंडेक्स) पोहोचून हवेच्या प्रदूषणात वाढ होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईसारख्या शहरामध्ये वायूप्रदूषण मोठ्या प्रमाणात होत असल्याने त्याचा सर्वात जास्त परिणाम नवजात बालकांच्या फुप्फुस, मेंदू तसेच त्यांच्या शारीरिक वाढीवर होत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबई शहरात विविध ठिकाणी हवेच्या गुणवत्तेच्या दर्जात घट होऊन प्रदूषण प्रचंड वाढल्याने नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण होवून त्यांना श्वसनाचे आजार उद्‌भवल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले व त्यानुसार मुंबई शहर उपनगरात वाढलेले प्रदूषणाचे प्रमाण रोखण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम : (१) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे सायन व वांद्रे या ठिकाणी मोजण्यात आलेल्या हवेच्या गुणवत्तेत माहे नोव्हेंबर २०१६ ते जानेवारी २०१८ या काळात धुलींकणांचे प्रमाण वाढले, हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
(४) मुंबई शहरातील वाढत्या प्रदूषणावर आळा घालण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत कृती आराखडा तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

पुणे जिल्ह्यातील व्यायामशाळा तसेच ग्रामीण आयुर्वेद महाविद्यालय पातुर (जि.अकोला) अनुदानापासून वंचित असल्याबाबत

(४२) * १०५१९० श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील व्यायामशाळा, कुस्ती, ज्युडो, कराटे तसेच अद्ययावत व्यायामशाळा विकास अनुदान सन २०११-१२ मधील मंजूर करण्यात आलेले साहित्य कंत्राटदाराने अद्यापपर्यंत संस्थाना पुरविले नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.१ यांच्या दिनांक १७ डिसेंबर, २०११ रोजीच्या आदेशातील क्र.१ प्रियदर्शिनी ग्रामीण व आदिवासी उत्कर्ष फाउंडेशन, नवेगाव, द्वारा संचालित ग्रामीण आयुर्वेद महाविद्यालय, पातुर, जि.अकोला यांच्या सह अनेक संस्था सन २०११-१२ च्या मंजूर अनुदानापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधित कंत्राटदार व्यायामशाळा, कुस्ती, ज्युडो, कराटे अद्ययावत व्यायामशाळा विकास अनुदान सन २०११-१२ मधील मंजूर साहित्याचा पुरवठा संस्थाना करीत नसल्याचे संबंधित संस्थांनी आयुक्त, क्रीडा व युवक संचालनालय, पुणे यांना वारंवार लेखी पत्रव्यवहाराद्वारे कळविले असतानाही अद्याप कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार शासनाने मंजूर केलेले उक्त अनुदान संबंधित लाभार्थी संस्थाना त्वरीत मिळणे बाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात संच मान्यतेनुसार अतिरिक्त ठरणाऱ्या शिक्षकांचे समायोजन करण्याबाबत

(४३) * १०५४०३ श्री.अजित पवार (बारामती), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती सुमन पाटील

(तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ३४ जिल्ह्यांमधील ६१ हजार ६७३ जिल्हा परिषद शाळांपैकी ६१ हजार ४९२ शाळांनी संच मान्यतेची ऑनलाईन प्रक्रिया पुर्ण केली असून त्यानूसार १४ हजार ९२ शिक्षक अतिरिक्त ठरणार असून सर्वाधिक संख्या अमरावती जिल्ह्यात तर कमी संख्या धूळे जिल्ह्यात आहे, तसेच प्राथमिक शिक्षकांच्या सुमारे २३ हजार ४३५ जागा रिक्त असल्याची बाब दिनांक २४ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खाजगी अनुदानित शाळांमध्ये अतिरिक्त झालेल्या शिक्षकांचे समायोजन जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये करण्याचा निर्णय शासनाने घेतला असतानाही अद्याप उक्त पदे रिक्त असल्याचे तसेच पुणे जिल्हयातील प्राथमिक व माध्यमिक शाळा मधील सन २०१६-२०१७ च्या संचमान्यतेनुसार सुमारे १५२ शिक्षक अतिरिक्त ठरविण्यात आल्यापैकी ९७ शिक्षकांचे ऑनलाईन समायोजन करण्यात आले मात्र उर्वरित ५१ शिक्षकांना रुजु करुन घेण्यास शाळांद्वारे टाळाटाळ करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने राज्यातील दहा पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करण्याच्या घेतलेल्या निर्णयामुळे ठाणे सह रायगड जिल्हयातील ४२ शाळा आतापर्यंत बंद झाल्या आहेत तर जिल्हयातील खासगी आणि जिल्हा परिषदेच्या एकूण १०३ शाळांपैकी ६१ शाळा बंद होणार असल्याने प्रत्येक जिल्ह्यात संच मान्यतेमुळे शिक्षक अतिरिक्त होणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच मुंबईतील अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनासाठी माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या सुमारास उत्तर विभागातून पश्चिम विभागात रिक्त जागी समायोजन करण्यात आलेल्या शिक्षकांचे वेतन ४ महिने होवूनही वेतनाच्या प्रतीक्षेत असून शालार्थ प्रणालीत अडचणी आल्यामुळे वेतन मिळण्यास उशिर होत असल्याचे कारण शिक्षण निरीक्षक पश्चिम कार्यालयातून (मुंबई) देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच खासगी प्राथमिक व माध्यमिक शांळातील अनुदानित पदावरील अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन शासनाच्या संकेस्थळावरून करण्याच्या सूचना शिक्षण विभागाने दिनांक १० जून, २०१६ रोजी वा त्यासुमारास केल्या असतांनाही सोलापूर जिल्हा परिषदेचे माध्यमिक शिक्षणाधिकारी यांनी ऑनलाईन पध्दतीने समायोजन न करता पदाचा दुरुपयोग करून ऑफलाईन पध्दतीने अनेक शिक्षकांचे समायोजन केले असल्याची तक्रार प्रहार शिक्षक संघटनेने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार अतिरिक्त ठरणाऱ्या उक्त शिक्षकांना अन्य शाळांमध्ये सामावून घेण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) हे अंशत: खरे आहे.

सन २०१६-१७ च्या संच मान्यतेनुसार ६१,२८६ शाळांची ऑनलाईन प्रक्रिया पूर्ण झाली आहे. जिल्हा परिषद शाळेत अतिरिक्त शिक्षक नसून १७,४६४ जागा रिक्त आहे. सन २०१७-१८ ची संच मान्यतेची कार्यवाही सुरु आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

जिल्हा स्तरावर समायोजन झालेल्या ९७ शिक्षकांपैकी प्रत्यक्ष ४४ शिक्षक समायोजनाने दिलेल्या शाळेत रुजू झाले आहेत. उर्वरित शिक्षक रुजू करुन घेण्यातबाबत शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्या मार्फत सुचना देण्यात आलेल्या आहेत.

(३) हे अंशत: खरे आहे

रायगड जिल्हयातील ४४ शाळांचे समायोजन पूर्ण झाले आहे. त्याचप्रमाणे १६ शाळांच्या विद्यार्थ्यांची वाहतूक भत्यांची सोय झाल्यास त्या १६ शाळांचे समायोजन होणार आहे.

२०१७-१८ ची संच मान्यता अंतिम करण्याची कार्यवाही चालू आहे.

(४) हे खरे नाही.

(५) हे खरे आहे.

(६) कार्यवाही सुरु आहे.

महाड (जि.रायगड) औद्योगिक वसाहती मधील कंपन्यामधून सावित्री नदीच्या पात्रात सोडण्यात येणाऱ्या रासायनिक सांडपाण्याबाबत

(४४) * १०४७७७ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि.रायगड) औद्योगिक वसाहती मधील कंपन्यामधून सावित्री नदीच्या पात्रात सोडण्यात येणाऱ्या प्रदूषित रासायनिक सांडपाण्यामुळे परिसरातील गावांमध्ये स्थानिक रहिवाशांना कॅन्सर, श्वसनाचे, फुफ्फुसाचे

विकार, अशक्तपणा, डोकेदुखी, नेत्रविकार, दमा आदी वेगवेगळे आजार होत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाडसह खाडीपट्ट्यातील २७ गावामधील रहिवाशी देखील विविध आजारांमुळे त्रस्त आहेत तसेच परिसरातील शेतकरी व मच्छिमार यांचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रदुषणावर मात करण्यासाठी प्रदुषण मंडळाने अदयावत तंत्रज्ञान वापरात न आणल्यामुळे तसेच उक्त औद्योगिक वसाहतीतील कारखान्यांवर कारवाई करण्यास दुर्लक्ष केल्यामुळे कारखानदारांमार्फत सावित्री नदीच्या पात्रात रासायनिक प्रदुषित पाणी सोडण्यात येत असल्यामुळे नागरीकांना अनेक आजारांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या परिसरातील औद्योगिक वसाहतीमधील कंपन्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, उक्त परिसरातील नागरिकांना झालेल्या आजारावर उपचार करण्याकरिता तसेच शेतकरी व मच्छिमार यांना आर्थिक नुकसानभरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम : (१), (२) व (३) नाही.

(४) माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान प्रक्रिया कृत सांडपाणी वाहून नेणाऱ्या वाहिनीची गळती झाल्यामुळे त्रास होत असल्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. याअनुषंगाने महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने गळतीच्या ठिकाणाच्या पाण्याचे नमुने संकलित करण्यात आले. त्याअनुषंगाने महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने एम.एम.ए.सी.ई.टी.पी. यांना दिनांक २२.१२.२०१७ रोजी कारणे दाखवा नोटिस बजावली असून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांना दिनांक २७.१२.२०१७ अन्वये सदर घटनेबाबत कळविण्यात आले आहे.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळातील बेकायदा नियुक्त्या मा.उच्च न्यायालयाने रद्द केल्याबाबत

(४५) * ११०७४१ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.अजय चौधरी (शिवडी), डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने २००९ मध्ये फील्ड ऑफीसर या पदावर राज्यभरात केलेल्या नियुक्त्या आणि ३९ उमेदवारांची प्रतिक्षा यादी तयार करतांना पुर्णपणे बेकायदा अशा निवड प्रकियेचा अवलंब करून गैरव्यवहार केला आहे असा स्पष्ट निष्कर्ष देवून मा.उच्च न्यायालयाने सर्व नियुक्त्या रदद केल्या असल्याची माहिती दिनांक २५ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरक्षणाचे प्रमाण कमाल ५२ टक्के असूनही या भरतीत ६५ टक्के जागांवर राखीव प्रवर्गातील उमेदवारांची निवड करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्यांचे आधीच्या प्रतिक्षा यादीत किंवा आताच्या निवड यादीतही नाव नव्हते अशा १० उमेदवारांची नियुक्ती करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर पदासाठी अभियांत्रिकी पदवी अशी शैक्षणीक अर्हता असतानांसुध्दा आठ वाणीज्य पदवीधारकांची नियुक्ती करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने उच्च स्तरीय अधिकाऱ्यांमार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, त्यानुसार दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम : (१) हे खरे आहे.
(२) मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाने दि.२२ जानेवारी,२०१८ रोजीच्या आदेशात असा निष्कर्ष मा.उच्च न्यायालयाने काढलेला आहे.
(३) मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाने दि.२२ जानेवारी,२०१८ रोजीच्या आदेशात असा निष्कर्ष मा.उच्च न्यायालयाने काढलेला आहे.
(४) मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाने दि.२२ जानेवारी,२०१८ रोजीच्या आदेशात असा निष्कर्ष मा. उच्च न्यायालयाने काढलेला आहे.
(५) व (६) मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाच्या दि.२२ जानेवारी,२०१८ रोजीच्या आदेशविरूद्ध महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून मा.सर्वोच्च न्यायलयात विशेष विनंती याचिका (Special Leave Petition) दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केलेली आहे.

रायगड जिल्हयातील समुद्र किना-यावरील सीआरझेड कायद्याचा भंग करुन केलेल्या अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्याबाबत

(४६) * १०५८४० श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.मोहन

फड (पाथरी), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.संजय कदम (दापोली) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील अलिबाग, मुरुड, रेवदंडा, मांडवा व श्रीवर्धन येथील समुद्र किनाऱ्यावर सीआरझेड कायदयाचा भंग करुन ३०० व्यक्तींनी व जमीन मालकांनी केलेल्या विनापरवानगी अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्याचे आदेश मा.पर्यावरण मंत्री यांनी देवून ३ वर्षे होवून सुद्धा अनधिकृत बांधकांमावर संबंधित विभागामार्फत अद्यापपर्यंत कोणतीच कारवाई झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अलिबाग तालुक्यात सीआरझेड कायदयाचे उल्लंघन करून १४५ व मुरूड तालुक्यात १६७ समुद्र किनारी अनधिकृत बांधकामे करण्यात आली असून केवळ १८ अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, समुद्रकिनारा भरती रेषेपासून ५०० मीटर आत पर्यावरण व सीआरझेड कायदयानुसार कुठल्याही स्वरूपाचे बांधकाम करता येत नाही, तसेच बांधकाम केल्यास त्यांच्यावर भारतीय पर्यावरण अधिनियम व महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियमांतर्गत गुन्हे दाखल करता येतात, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या तसेच अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यास दिरंगाई करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम : (१) हे खरे नाही.
(२) अलिबाग व मुरुड तालुक्यातील समुद्र किनारी बांधण्यात आलेल्या अनुक्रमे १४५ व १६७ बांधकाम धारकांना महाराष्ट्र नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ५२, ५३, ५४ व ५५ तसेच पर्यावरण (संरक्षण) कायदा १९८६ चे कलम ३ (१) व १५ अन्वये नोटिस बजावण्यात आल्या आहेत. सदर दाव्यांपैकी अलिबाग तालुक्यातील ६१ व मुरुड तालुक्यातील १०१ दाव्यामधील अनधिकृत बांधकामाबाबत मा.न्यायालयाने तात्पुरते स्थगिती आदेश दिलेले आहेत.

सदर दोन्ही तालुक्यातील अनधिकृत बांधकामापैकी अलिबाग तालुक्यातील ६९ व मुरुड तालुक्यातील ९५ प्रकरणांमध्ये महाराष्ट्र नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ५२, ५३, ५४ व ५५ व केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयाच्या दिनांक ०६.०१.२०११ रोजीच्या अधिसूचनेमधील निर्देशांचे उल्लंघन केल्याने संबंधितांविरुध्द पर्यावरण (संरक्षण) कायदा १९८६ चे कलम ३ (१) व १५ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
(३) होय.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

मुंबईसह राज्यातील शैक्षणिक संस्थांमध्ये अग्नीशमन यंत्र व प्रथमोपचार पेटी बसविण्याबाबत

(४७) * १०४९८३ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम),

श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यातील शैक्षणिक संस्थांना शासनाने सन २००९ मध्ये शाळांमध्ये अग्निशमन यंत्रणा बसविण्या संदर्भात सूचना दिल्या असून सुरक्षेच्या दृष्टीने अग्नीशमन यंत्र व प्रथमोपचार पेटी ठेवण्याचे आदेश शालेय शिक्षण विभागाने दिनांक २७ नोव्हेंबर, २०१७ रोजी निर्गमित केले असतानाही काही संस्थांनी त्याचे पालन केले नसल्याचे दिनांक ६ जानेवारी, २०१८ रोजी व त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच तिवसा (जि.अमरावती) तालुक्यातील ग्रामीण भागासह शहरी भागातील शाळांमध्ये अग्नीशमन यंत्र व प्रथमोपचार पेटी ठेवण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार नियम न पाळणाऱ्या शिक्षण संस्थांवर कारवाई करुन शाळांमध्ये अग्निशमन यंत्रणा बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील दारिद्र्यरेषेखालील अंत्योदय योजनेतील केशरी कार्डधारक जीवनावश्यक रास्त धान्य व वस्तूंपासून वंचित राहत असल्याबाबत

(४८) * १०९९७० डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात तसेच पालघर जिल्ह्यात दारिद्र्यरेषेखालील, अंत्योदय योजनेतील १ ते २ व्यक्ती असलेल्या कुटुंबांचे रेशन कार्ड अंत्योदय मधून प्राधान्य यादीत समाविष्ट करण्यात आल्याने व ७० टक्के केशरी कार्ड धारकांमधील कुटुंब जीवनावश्यक रास्त धान्य पुरवठा व इतर जीवनावश्यक वस्तूंपासून वंचित राहत असल्याबाबत समर्थन या संस्थेने दिनांक १० जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री, प्रधान सचिव, अन्न व नागरीपुरवठा व अध्यक्ष, राज्य ग्राहक संरक्षण यंत्रणा यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या योग्य नियोजनाअभावी ९७,०८५ अंत्योदय योजनेतील व केशरी कार्डधारकांमधील ७० टक्के कुटुंबाचा प्राधान्य यादीत समावेश करण्यात आल्याने रास्त धान्य कार्डधारकांना त्यांचे हक्काचे असलेले धान्य वितरीत करण्याबाबत तसेच गावपातळीवर व आदिवासी भागात तात्काळ अंमलबजावणी करण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) असल्यास, पात्र लाभधारकांना आवश्यक ते १०० टक्के रास्त धान्य व इतर जीवनावश्यक वस्तू लाभार्थी कार्डधारकांना मिळत नसल्याबाबतच्या तक्रारी श्रमजीवी संघटनेचे संस्थापक तथा माजी लोकप्रतिनिधी यांनी ठाणे, पालघर, रायगड व नाशिक या ४ जिल्ह्यांमधील तहसील कार्यालयांकडे व शासनाकडे तक्रारी दाखल केलेल्या आहेत हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जीवनावश्यक रास्त धान्य पुरवठा व इतर जीवनावश्यक वस्तूंपासून लाभार्थ्यांना वंचित ठेवणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, प्राधान्यक्रमातील लाभार्थ्यांची यादी शासनस्तरावर निश्चित करून अंत्योदय योजनेबाबत शासनाने काढलेला आदेश त्वरित मागे घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) होय.

(२) पात्र व त्याच लाभार्थ्यांला धान्याचे वितरण व्हावे म्हणून PoS द्वारे शिधापत्रिकाधारकांची बायोमेट्रीक ओळख पटवून धान्याचे वितरण केले जात आहे.

(३) होय.

(४) राज्यातील शिधापत्रिकाधारकांचे आधार सिडींगचे काम सुरु आहे. त्या आधार सिडींगनुसार इष्टांक बदलाची कार्यवाही सुरु असून, कोणताही पात्र व योग्य लाभार्थी अन्नधान्याच्या लाभापासून वंचित राहणार नाही याबाबत दक्षता घेण्यात येत आहे.

(५) अंत्योदय अन्न योजनेतील ज्या शिधापत्रिकाधारकांना प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांमध्ये समाविष्ट करण्यात आले आहे, त्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमातील तरतूदीनुसार प्रतिमाह प्रतिव्यक्ती ५ किलो अन्नधान्याचा पुरवठा करण्यात येत आहे. अशा प्रकारे लाभार्थ्यांना अन्नधान्याचा लाभ मिळण्यापासून वंचित ठेवण्यात आले नसल्याने, सदर निर्णय सद्यस्थितीत रद्द करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील अकरावीच्या परिक्षा पध्दतीत करण्यात आलेला बदल

(४९) * १०५४१६ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.भारत भालके (पंढरपूर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय पातळीवरच्या परिक्षा देताना मागील वर्षी (२०१६-१७) राज्यातील सुमारे साडेचार लाख विद्यार्थ्यांपैकी अवघ्या २८ हजार विद्यार्थ्यांना ५० टक्क्यापेक्षा जास्त गुण मिळविण्यात यश मिळाले, असून भविष्यात राष्ट्रीय पातळीवरील सामायिक परिक्षा सक्तीच्या करण्यात आल्या तर राज्यातील विद्यार्थ्यांना त्या देणे सोपे व्हावे या उद्देशाने शासनाने ११ वीच्या परिक्षा पध्दतीत बदल केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बदलामुळे यावर्षी (२०१७-१८) विविध महाविद्यालयामध्ये जाहिर झालेल्या सहामाही परिक्षांच्या निकालात सुमारे ४० टक्के विद्यार्थी नापास झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या परिक्षा पध्दतीचा परिणाम अकरावीच्या निकालावर होत असल्याचे महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघांचे अध्यक्षांचे म्हणणे असून, परिक्षा पध्दतीतील बदलामुळे या वर्षीच्या शैक्षणिक वर्षात अकरावीचा निकाल कमालीचा घसरेल, तर सर्व परिक्षांची तुलना नीट व जेईईशी करु नये, तसे झाल्यास विद्यार्थी मुख्य प्रवाहातून बाहेर पडतील व १७ क्रमांकाचा अर्ज भरुन १२ वी ची परिक्षा देतील या बाबीकडे शासनाचे लक्ष वेधले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) याबाबत तक्रार प्राप्त झालेली नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील कांदिवली (पूर्व) गोराई येथील स्वामी विवेकानंद शाळा प्रशासनाने मराठी माध्यमातील एस.एस.सी अभ्यासक्रम बंद केल्याबाबत

(५०) * १०९२३९ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगर, कांदिवली (पूर्व), गोराई येथील स्वामी विवेकानंद शाळा प्रशासनाने, महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाशी, संलग्नित मराठी माध्यमातील एस.एस.सी अभ्यासक्रम बंद करुन, म्हाडाबरोबर केलेल्या, भाडेपट्टा करारनामातील २ (४) च्या तरतूदींचे व अटी नियमाचे भंग केल्याप्रकरणी, सदरहू शाळेला दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास खुलासा करण्यासाठी नोटीस पाठविली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू शाळा व्यवस्थापनास पश्चिम विभागीय शिक्षण निरीक्षक कार्यालयाने, कारणे दाखवा नोटीस पाठवून, सात दिवसात खुलासा करण्यास सांगणे तसेच योग्य खुलासा न केल्यास एस.एस.सी. मंडळानी शाळा चालविण्यास दिलेली मान्यता रद्द करण्याचा इशारा दिला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास म्हाडा व शिक्षण निरीक्षक कार्यालयास, शाळा व्यवस्थापनाने दिलेल्या खुलाशाचे निष्कर्ष काय आहेत,
(४) असल्यास, सदरहू प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले, त्यानुसार उक्त शाळेची मान्यता रद्द करणेबाबत, कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) हे खरे आहे.
(२) अंशतः खरे आहे.
(३) शाळा व्यवस्थापनास दि. १६.१२.२०१७ व दि. १८.१.२०१८ च्या पत्रांन्वये कारणे दाखवा नोटिस पाठविण्यात आली असून त्यावर खुलासा प्राप्त झालेला नाही.
(४) याअनुषंगाने उचित कार्यवाही करण्यात येत आहे.

शिवाजीनगर (जि.पुणे) येथील धान्य गोदामात गहू कमी प्रमाणात आढळून आल्याबाबत

(५१) * १०५१९३ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर

काळे (आर्वी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिवाजीनगर (जि.पुणे) येथील धान्य गोदामाच्या पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, मुंबई येथील तपासणी पथकाने केलेल्या तपासणीत अंदाजे मूल्य दहा लक्ष रु. चे २९५४ पोती गहू कमी आढळून आल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर कमी आढळून आलेल्या धान्यसाठ्याची एकूण ९,८९,५९०/- रुपयाच्या रक्कमेच्या वसुलीसंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, राज्याच्या अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या तपासणी पथकाने शिवाजीनगर, पुणे येथील धान्य गोदामाची तपासणी करून जवळपास ५० लाख रूपयांचा धान्य गैरव्यवहार झाल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आणली, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तसेच उपरोक्त रकमेच्या वसुलीच्या संदर्भात व संबधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१), (२), (३), (४) व (५) हे खरे नाही. तथापि पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, मुंबई येथील तपासणी पथकाने दिनांक १०.३.२०११ ते दिनांक १९.०३.२०११ या कालावधीत शिवाजीनगर, पुणे शहर गोदामाची फेर तपासणी केली. सदर तपासणीत गहू २९५४ पोती कमी आढळून आला. सदर कमी आढळून आलेल्या धान्यसाठयाची एकूण रक्कम रु.९,८९,५९०/- असून सदर वसुलीच्या संदर्भात संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन वसुलपात्र रक्कम अधिकारी/कर्मचारीनिहाय परिगणित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

शासनाने खरेदी केलेली तूरडाळ रेशन दुकानातून ५५ रुपये प्रतिकिलो दराने विकण्याचा घेतलेला निर्णय

(५२) * १०६१२४ श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.संजय कदम (दापोली), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.भारत भालके (पंढरपूर) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने खरेदी केलेली २५ लाख २५ हजार क्विंटल तूरडाळ रेशन दुकानातून ५५ रुपये प्रतिकिलो दराने विकण्याचा निर्णय माहे २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घेतला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खरेदी केलेली तूरडाळ शिधापत्रिका धारकांना माहे डिसेंबर, २०१७ ते जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान रेशन दुकानामधून वाटप करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार शिधापत्रिका धारकांना तुरडाळ वितरीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) होय.

(२) व (३) रास्तभाव धान्य दुकानदारांमार्फत शिधापत्रिकाधारकांना तूरडाळीचे वाटप सुरु करण्यात आलेले आहे. शासकीय गोदामात प्राप्त झालेली तूरडाळ स्वस्त धान्य दुकानांना इतर धान्यांसोबत पुरविण्यात येत असल्याने, आणि काही जिल्ह्यांमध्ये माहे जानेवारी, २०१८ चे अन्नधान्याचे वितरण झाल्यानंतर तूरडाळ प्राप्त झाल्याने माहे फेब्रुवारी, २०१८ या महिन्यापासून तूरडाळीचे वितरण करण्यात येत आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

तळोजा (ता.पनवेल, जि.रायगड) औद्योगिक वसाहतीत रसायनिक कंपन्यांमुळे होणारे प्रदूषण

(५३) * १०५८४७ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.भारत भालके (पंढरपूर), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.मनोहर भोईर (उरण) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळोजा (ता.पनवेल, जि.रायगड) औद्योगिक वसाहतीत बाहेरून रासायने भरून आलेल्या टँकरद्वारे नदी नाल्यात सोडण्यात येणाऱ्या रसायनांमुळे आजुबाजुच्या परिसरात प्रदुषण होऊन नागरीकांच्या जीवाला धोका निर्माण झाला असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवी मुंबईतील तळोजा एमआयडीसीतील कंपन्या स्वत:च्या प्रकल्पात तयार होत असलेल्या रासायनिक सांडपाण्यावर प्रक्रिया करत नसल्याने त्याचा ताण सीईटीपी केंद्रावर येत असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे तसेच सुमारे ९०० हेक्टर जमिनीवर पसरलेल्या तळोजा औद्योगिक वसाहतीत प्रदुषण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त औद्योगिक वसाहतीमधील प्रदुषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र आद्यौगिक विकास मंडळाच्या दुर्लक्षामुळे टँकरद्वारे घातक रसायन तसेच मोठ्या प्रमाणात कारखानदाराद्वारे टाकण्यात आलेल्या डेब्रीजमुळे प्रदुषणात वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तळोजा वसाहतीतील प्रदुषणाची पातळी वाढल्याचे “एमपीसीबी” च्या दैनंदिन अहवालातून स्पष्ट झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार प्रदुषणाला कारणीभुत ठरणाऱ्या उक्त औद्योगिक वसाहतीतील किती कारखानदार व टँकर धारकांवर कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम : (१) दिनांक २३.१०.२०१७ रोजी तळोजा एमआयडीसीमधील नाल्यामध्ये टँकर मधून सांडपाणी टाकत असल्याचे निदर्शनास आले होते.

(२) अंशत: खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

(४) अंशत: खरे आहे.

(५) होय. सदरहू टँकर धारका विरुध्द दिनांक २५.१०.२०१७ रोजी एमआयडीसी तळोजा पोलिस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे माहे जानेवारी, २०१७ ते दिनांक १६ फेब्रुवारी, २०१८ या कालावधीत एकूण १३५ कारखान्यांविरुध्द जल (प्र.व.नि.) कायदा १९७४, वायू (प्र व नि) कायदा १९८१ मधील तरतूदीनुसार कारवाई करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील जिल्हापरिषद शाळेतील विद्यार्थ्यांसाठी देण्यात येणाऱ्या गणवेश निधीबाबत

(५४) * १०५४२७ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.भारत भालके (पंढरपूर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली), श्री.वैभव नाईक (कुडाळ) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जाती जमातीसह इतर विद्यार्थ्यांना गणवेश देताना गणवेश देण्याऐवजी त्याचे पैसे त्यांच्या बँक खात्यात जमा करण्याबाबत जिल्हा परिषदेने माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान परिपत्रक काढले असून त्यासाठी राष्ट्रीयकृत बँकेत आई व विद्यार्थी यांचे जोड खाते असणे बंधनकारक करण्यात आले असल्याने अनेक विद्यार्थी या लाभापासून वंचित राहिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान सुधारित परिपत्रक काढून वडिलांसोबत असलेल्या खात्यातही पैसे जमा करण्यात येतील, असे जाहिर केले असून गणवेश खरेदीची पावती सादर करण्याची सक्ती करण्यात आली असल्याने बहुतांश पालकांकडे गणवेश खरेदीची पावती उपलब्ध नसल्याने अनेक विद्यार्थी गणवेशापासुन वंचित राहणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बिलोली (जि.नांदेड) तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेतील २५०० विद्यार्थी आई समवेत संयुक्त बॅक खाते न काढल्यामुळे गणवेशापासून वंचित असल्याचे तसेच उमरगा व लोहारा (जि.उस्मानाबाद) या तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या च्या २१९ शाळांमधील २०७८१ पैकी सुमारे १५२८८ विद्यार्थी तर जळगाव जिल्हयातील एक लाख विद्यार्थी गणवेश हे खाते काढण्यासाठी असलेल्या बँकेच्या जाचक अटींमुळे गणवेशाच्या लाभापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील सर्व जिल्हयांमध्ये ९८ हजार विद्यार्थ्यांना सर्व शिक्षा अभियानांतंर्गत सुरु केलेल्या उक्त मोफत गणवेश योजना नियोजना अभावी अयशस्वी ठरली असल्याचे तर हिंगोली जिल्हयामध्ये सन २०१७-१८ च्या दुसऱ्या सत्रात ही गणवेश दुकानातच असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले असून बँक खाते उघडणे बाबतची प्रक्रिया सुलभ करणे व विद्यार्थ्यांना तात्काळ गणवेश वाटप होणेबाबत अनेक लोकप्रतिनिधी व सामाजिक संघटना यांनी मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशी नुसार शासनाने बँक खाते उघडणे बाबतची प्रक्रिया सुलभ करणे व विद्यार्थ्यांना तात्काळ गणवेश वाटप होणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१), (२), (३), (४) व (५) शासनाच्या दि. ०५/१२/२०१६ च्या शासन निर्णयानुसार लाभार्थ्यांना देण्यात येणारा लाभ लाभार्थ्यांच्या थेट बँक खात्यामध्ये जमा करण्यासाठी मोफत गणवेश योजनेची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने भारत सरकारच्या मार्गदर्शक सूचनानुसार लाभार्थी विद्यार्थ्यांचे त्यांच्या आईच्या नावासह आधार संलग्न संयुक्त बँक खाते राष्ट्रीयकृत बँक शेडयुल्ड बँक, ग्रामीण बँकामध्ये उघडण्याबाबतच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. तथापि, याबाबत काही अडचणी उद्भवल्याने स्वत: लाभार्थी विद्यार्थी व आई यांच्या आधार संलग्न संयुक्त बँक खात्याचा आग्रह न धरता विद्यार्थी किंवा आई किंवा वडील आणि आई-वडील नसल्यास लाभार्थ्यांचे अन्य पालकांच्या वैयक्तिक आधार संलग्न खात्यावर गणवेश लाभाची रक्कम वर्ग करण्याबाबत सर्व क्षेत्रिय यंत्रणांना कळविण्यात आले आहे.

शासनाच्या दि. ०५/१२/२०१६ च्या शासन निर्णयानुसार लाभार्थ्यांने अगोदर गणवेशाची खरेदी करुन त्या खरेदीची पावती सादर केल्यांनतरच लाभाची रक्कम बँक खात्यात वर्ग करण्याची तरतूद आहे.

सदर योजनेंतर्गत एकूण पात्र ३७,६२,०२७ लाभार्थी विद्यार्थ्यांपैकी २४,४०,३८९ विद्यार्थ्यांची बँक खाती उघडण्यात आली असून त्यापैकी १९,१७,८९० विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात लाभाची रक्कम जमा करण्यात आली आहे. गणवेश खरेदीची पावती जमा न केलेल्या ५,२२,४९९ विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात अद्याप लाभाची रक्कम जमा झालेली नाही. एकूण लाभार्थ्यांपैकी उर्वरित १३,२१,६३८ लाभार्थी विद्यार्थ्यांची बँक खाती उघडण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. सद्यस्थितीत बँक खाती नसलेल्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश योजनेचा लाभ देण्यास्तव त्यांना चालू वर्षापुरती DBT योजनेमधून सुट दिली आहे.

विद्यार्थ्यांची बँक खाती शून्य रक्कमेवर (Zero Balance) वर उघडण्याबाबत आणि सदर खात्यावर कोणतेही शुल्क न आकारण्याबाबत बँकांना निर्देश देण्यात यावे आणि सर्व विद्यार्थ्यांची बँक खाती काढण्यास कालावधी मिळण्यासाठी या व पुढील शैक्षणिक वर्षासाठी मोफत गणवेश योजनेस एका वर्षासाठी सूट देण्यात यावी, अशी विनंती नियोजन आणि वित्त विभागास करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन : **डॉ. अनंत कळसे**
मुंबई. **प्रधान सचिव,**
महाराष्ट्र विधानसभा

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.